CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २१ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ६८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## हनुमान मंदिराचा सभा मंडप कोसळल्याने ३० ते ४० भाविक दबल्याची भिती !

तभा वृत्तसेवा

परभणी : परभणीच्या मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध हनुमान मंदिरासमोरील सभा मंडप कोसळल्याने या सभा मंडपाखाली अंदाजे ३०ते ४० भाविक दबल्याची भीती व्यक्त होत आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत सात भाविकांचा दबून मृत्यू झाल्याची माहिती सून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जाताही. घटनेची माहिती मिळताच प्रशासन घटनास्थळी दाखल झाले आहे. प्रशासनाकडून सभा मंडपाच्या खाली दबलेल्या भाविकांना काढण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे.



### ७ भाविकांचा दुर्दैवी मृत्यू

परभणीच्या मानवत तालुक्यातील यशवाडीमधील हनुमान मंदिर हे प्रचंड प्रसिद्ध आहे. राज्यभरातून अनेक भाविक या मंदिरात दर्शनासाठी येत असतात. याशिवाय आज शनिवार आहे. दर शनिवारी अनेक भाविक हनुमान मंदिरात दर्शनासाठी जातात. त्यामुळे यशवाडीतील हनुमान मंदिरात शनिवारी भाविकांची गर्दी असते. याशिवाय अनेकांना शनिवार-रविवार सुट्टी असल्याने अनेक भाविक राज्याच्या विविध भागांतून इथे दर्शनासाठी येतात.

नेहमीप्रमाणे आजदेखील अशीच भाविकांची गर्दी हनुमान मंदिराच्या परिसरात होती. याच वेळी अचानक मंदिरासमोरील सभा मंडप कोसळला. या सभा मंडपाखाली ३० ते ४० भाविक दबल्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनेचं गांभीर्य ओळखून प्रशासन तातडीने घटनास्थळी दाखल झालं आहे. प्रशासनाकडून तातडीने बचावकार्य सुरु झालं आहे.

घटनास्थळी पोलीस, जिल्हा प्रशासनाचे अधिकारी, स्थानिक नेतेमंडळी घटनास्थळी दाखल झाले आहेत. घटनास्थळी रुग्णवाहिका दाखल झाल्या आहेत. ढिगाऱ्याखाली दबलेल्या भाविकांचा युद्ध पातळीवर शोध घेतला जात आहे. ढिगाऱ्याखालून काढलेल्या काही जखमींना तातडीने रुग्णवाहिकेच्या सहाय्याने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तसेच ढिगाऱ्याखाली दबलेल्या भाविकांचे देखील बचावकार्य केले जात आहे. क्रेनच्या सहाय्यातून बचाव कार्य केले जात आहे. नागरिकांना अनावश्यक गर्दी करु नये, असं आवाहन प्रशासनाकडून केलं जात आहे.

दर्शनासाठी आलेल्या भाविकांना आपल्यासोबत असं काही घडेल असं कधीच वाटलं नव्हतं. सभा मंडपाचं काम सुरु होतं. आज शनिवार असल्याने मंदिर परिसरात नेहमीप्रमाणे गर्दी होती. याच गर्दीतील काही भाविकांवर सभा मंडपाचा काही भाग कोसळला. हा सभा मंडप कोसळल्यानंतर मोठी खळबळ उडाली. प्रचंड आक्रोश आणि किंकाळ्या परिसरात ऐकू येऊ लागल्या. प्रचंड खळबळ उडाली. उपस्थित भाविकांनी आणि मंदिर प्रशासनाशी संबंधित काही जणांनी तातडीने बचावकार्य सुरु केले. तसेच पोलिसांनादेखील तातडीन या घटनेची माहिती देण्यात आली. घटनेची माहिती वाऱ्यासारखी पंचक्रोशीत पसरली आणि आजूबाजूच्या गावांमधून लोक बचावासाठी येऊ लागली. या घटनेने परभणी जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात खळबळ उडाली आहे.

## गणपतीपुळेच्या समुद्रात बिडकीनचे पाच तरुण बुडाले

### एकाचा मृतदेह सापडला, शोधकार्य सुरू



तभा वृत्तसेवा

बिडकीन : रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ गणपतीपुळे येथे आज (दि. २० जून) सकाळी सुमारे १० वाजण्याच्या दरम्यान दुर्दैवी घटना घडली. बिडकीन येथून पर्यटन व देवदर्शनासाठी गेलेल्या १९ तरुणांच्या गटातील पाच जण समुद्रात बुडाले. त्यापैकी एका तरुणाचा मृतदेह सापडला आहे. उर्वरित चार जणांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बिडकीन (ता. पैठण) येथील १९ तरुणांचा गट भाड्याने वाहन करून गणपतीपुळे येथे पर्यटन व देवदर्शनासाठी गेला होता. आज सकाळी समुद्रकिनारी फिरत असताना गटातील आठ जण समुद्रात उतरले. मात्र, समुद्रातील पाण्याचा वेग आणि उंच लाटांचा अंदाज न आल्याने ते अडचणीत सापडले. यावेळी स्थानिक नागरिक आणि जीवरक्षकांनी तत्काळ धाव घेत बचावकार्य सुरू केले. त्यामध्ये तीन जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. मात्र खालील पाच तरुण समुद्राच्या खोल पाण्यात वाहून गेले. मयतात आदित्य संतोष राऊत (वय २२, रा. कृष्णापूर, बिडकीन),अनिकेत बंडू हिवराळे (वय २०, रा. कृष्णापूर, बिडकीन), आनंद राजू नरवडे (वय २०, रा. बिडकीन), प्रेम दीपक आदामने (वय १९, रा. सहयोग नगर, बिडकीन), यश रामेश्र्वर कांबळे (वय १९, रा. बिडकीन).

शोध मोहीमेदरम्यान प्रेम दीपक आदामने यांचा मृतदेह सापडला असून, उर्वरित चार जणांचा शोध पोलीस, स्थानिक प्रशासन आणि जीवरक्षकांकडून सुरू आहे. घटनास्थळी पोलीस व प्रशासनाचे अधिकारी दाखल झाले असून बचाव व शोधकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. दरम्यान, गटातील उर्वरित १४ जणांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे.या दुर्दैवी घटनेमुळे बिडकीन परिसरात हळहळ व्यक्त होत असून संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

## रेल्वचा दंड दुप्पट

मुंबई : रेल्वेने प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी मोठी बातमी आहे. विनातिकीट प्रवास करणाऱ्यांविरोधात भारतीय रेल्वेने कठोर पाऊल उचलले असून शनिवारपासून दंडाची रक्कम दुप्पट करण्यात आली आहे. त्यामुळे तिकीट न घेता प्रवास करणाऱ्यांना आता मोठा आर्थिक फटका बसणार आहे. केंद्र सरकारच्या 'जन विश्र्वास कायदा २०२६' अंतर्गत रेल्वे कायद्यात महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. रेल्वे कायदा १९८९ मधील कलम १३७ आणि १३८ मध्ये सुधारणा करून विनातिकीट प्रवासासाठी आकारला जाणारा किमान दंड २५० रुपयांवरून थेट ५०० रुपये करण्यात आला आहे. रेल्वे मंत्रालयाने याबाबत १९ जून रोजी अधिसूचना जारी केली असून नव्या नियमांची अंमलबजावणी २० जूनपासून सुरू झाली आहे.

## विकास आराखड्याचा शिलान्यास

कोल्हापूर : करवीर निवासिनी श्री अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिर विकास आराखडा आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिलान्यास झाला. १४४५.९७ कोटींच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात मंदिर जतन, वारसा संवर्धन, भाविकांसाठी आधुनिक सोयी आणि धार्मिक पर्यटनाचे संवर्धन यावर भर देण्यात आला आहे. पहिला टप्प्यात टप्प्यात मूळ मंदिराचे संवर्धन, विद्युतीकरण व सुरक्षा व्यवस्थेसाठी उल्हाणापूर्वक कामे सुरू असून एकूण २८०५८ चौरस मीटर भूसंपादनाचे काम देखील प्रगतीपथावर आहे.

## मृगाची हुलकावणी

नाशिक : चैत्र आणि वैशाख महिन्यात हमखास बरसणाऱ्या वळवाच्या सरी यावर्षी आल्या नाहीत. त्यात मृगनक्षत्राने हुलकावणी दिली आहे. त्यामुळे जलाशयांची माया अटली आहे. रानावनात हिरवळ निर्माण झालेली नाही. सर्वत्र वैराण वाळवंटाप्रमाणे रखरखीत उन्हाळा जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यातही कायम राहिला आहे. मानवी वस्तीला पिण्याच्या पाण्यासह पशुधनाला आवश्यक असणारे चारा पाणी आता दुरापास्त होत आहे. यापुढील चार दोन दिवसांत पाऊस आला नाही, तर भीषण दुष्काळाची चाहुल लागली, असे म्हणावे लागेल अशी स्थिती आहे.

## अद्याप निर्णय नाही : निंबाळकर

मुंबई : उबाठा गटाच्या ६ फुटीर खासदारांमध्ये नाव असलेले धाराशीवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पवनराजे निंबाळकर हत्याप्रकरणाच्या निकालानंतर धक्कादायक विधान केले आहे. शिवसेनेत जाण्याबाबत मी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. मी माझ्या मतदारसंघात जाऊन कार्यकर्त्यांशी चर्चा करेन आणि मगच पुढील निर्णय घेईन. या खटल्याचा निकाल आणि माझ्या राजकीय निर्णयाचा कोणताही संबंध नाही; सध्या कलियुग सुरू आहे, असे ओमराजे यांनी सांगितले. त्यामुळे खासदारांच्या बंडाबाबत सस्पेन्स वाढला आहे. पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणात शनिवारी विशेष न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केल्याने खासदार ओमराजे निंबाळकरांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

## प्रेयसीच्या मुलाला संपवले

पुणे : लग्न करण्यास नकार देणे आणि तीन वर्षीय मुलाला पहिल्या नवऱ्याकडे सोडण्यास नकार दिल्याच्या रागातून लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या प्रियकराने प्रेयसीच्या मुलाचा खून केल्याची धक्कादायक घटना रांजणगाव परिसरात घडली. याप्रकरणी रांजणगाव पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३ (२) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## लग्नाच्या तोंडावर 'भाजप'ची आत्महत्या

वृत्तसंस्था

भोपाळ : लग्नाच्या तोंडावर एका तरुणीनं जीवन संपवलं. १९ वर्षीय तरुणीच्या मृत्यूनं कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे. तरुणीनं घेतलेल्या आत्मघाती निर्णयामुळे गावावर शोककळा पसरली आहे. भाजपा प्रजापती असं मृत तरुणीचं नाव आहे. तरुणीच्या अनोख्या नावामुळे संपूर्ण प्रकरण सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरलं आहे. तरुणीच्या लग्नाची पत्रिकादेखील व्हायरल झाली आहे.

मध्य प्रदेशच्या सिंगरौली जिल्ह्यातील कर्थुआ बेहरा गावात वधूनं लग्नाच्या काही तास आधी जीवनयात्रा संपवली.

भाजप प्रजापती (१९) असं मृत तरुणीचं नाव आहे. ती मेवालाल प्रजापती यांची कन्या होती. १९ जूनला तिचा विवाह होणार होता. सरईत राहणाऱ्या गेंदालाल नावाच्या तरुणीसोबत भाजपा लग्न बंधनात अडकणार होती.घरात लग्नाची तयारी जोरात सुरू होती. संपूर्ण कुटुंब, नातेवाईक आनंदात होते.




घरात उत्साहाचं वातावरण होतं. लग्न घरात लगबग सुरू होती. सनई चौघड्यांचे सूर घरात निनादत होते. या सगळ्यात भाजपनं टोकाचं पाऊल उचललं. त्यामुळे आनंदात, उत्साहात असलेल्या कुटुंबावर, नातेवाईकांवर दु:खाचा डोंगर कोसळला. मृत तरुणीचं नाव भाजपा असल्यानं तिच्या मृत्यूची बातमी सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली. तरुणीच्या अजब नावाची बरीच चर्चा झाली. मृत्यूची माहिती मिळताच चितरंगी ठाण्याचे पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी शव ताब्यात घेतलं. पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण केली आणि शव उत्तरीय चाचणीसाठी रुग्णालयात पाठवलं. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

## TMC तब्बल १,३०० कोटींहून अधिक रकमेची तीन बँक खाती गोठवली

वृत्तसंस्था

कोलकाता : पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. निवडणुकीतील पराभवानंतर अंतर्गत संघर्षाने ग्रासलेल्या तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला असून पक्षाची एचडीएफसी बँकेतील तीन महत्त्वाची खाती गोठवण्यात आली आहेत. या खात्यांमधून कोणताही आर्थिक व्यवहार करण्यास सध्या बंदी घालण्यात आली असून प्रत्येक खात्यात तब्बल ४४० कोटी रुपये जमा असल्याचे समोर आले आहे.पक्षाचे माजी खजिनदार अरूप बिस्वास यांनी एचडीएफसी बँकेला पत्र लिहून पक्षाची खाती गोठवण्याची मागणी केली होती. पक्षाचे खरे नेतृत्व कोणाकडे आहे, याबाबत गंभीर वाद सुरू असल्याने निधीच्या सुरक्षेसाठी तातडीची पावले उचलण्याची गरज असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले होते. विशेष म्हणजे, याच महिन्याच्या सुरुवातीला अरूप बिस्वास यांना खजिनदारपदावरून हटवण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी केलेल्या या हालचालीमुळे पक्षातील संघर्ष आणखी तीव्र झाल्याचे मानले जात आहे.या घडामोडी अशा वेळी समोर आल्या आहेत, जेव्हा टीएमसीचे २० लोकसभा खासदार सभापती ओम बिरला यांची भेट घेऊन नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया मध्ये विलीन होण्याची घोषणा केल्याचा दावा करण्यात आला आहे. बंडखोर गटाने आपणच खरी तृणमूल काँग्रेस असल्याचा दावा करत पक्षाचे नाव, निवडणूक चिन्ह आणि मालमत्तेवर हक्क सांगितला आहे. त्यामुळे पक्षातील सत्तासंघर्ष आता थेट आर्थिक मालमत्ता आणि निधीच्या नियंत्रणापर्यंत पोहोचला आहे.निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या २०२४-२५ च्या लेखापरीक्षण अहवालानुसार, तृणमूल काँग्रेसची एकूण मालमत्ता १,०८१.७८ कोटी रुपये इतकी आहे.यामध्ये ६२५.७८ कोटी रुपये विविध बँक खात्यांमध्ये, २५०.७७ कोटी रुपये गुंतवणुकीत तर ५० कोटी रुपये धनादेशांच्या स्वरूपात असल्याची नोंद आहे.अरूप बिस्वास यांनी बँकेला पाठवलेल्या पत्रात खात्यांमधील निधी सुरक्षित ठेवण्यासाठी कोणतेही डेबिट व्यवहार, निधी हस्तांतरण किंवा खात्यांच्या कार्यपद्धतीत बदल करण्यास मनाई करण्याची मागणी केली होती. पक्षाच्या नेतृत्वावरून निर्माण झालेला वाद निकाली निघेपर्यंत निधीचा गैरवापर होऊ नये, तसेच अनधिकृत व्यक्तींना आर्थिक व्यवहार करता येऊ नयेत, यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



## कुर्नुल जिल्ह्यात सापडला ५० टन सोन्याचा साठा

वृत्तसंस्था

कुर्नुल : भारताचे दक्षिणेकडील राज्य येत्या काही वर्षांत देशातील सोन्याचा सर्वात मोठा पुरवठादार बनू शकते. येथे सोन्याचे मोठे साठे सापडले असून लवकरच खाणकाम सुरू होईल. देशभरात सोन्याची मागणी वाढत असताना भारतात ५० टन सोन्याचा साठा सापडला असून हा सोन्याचा साठा आंध्र प्रदेशातील कुर्नुल आढळला आहे.कुर्नूल जिल्ह्यातील जोन्नागिरी गावातसोन्याचा इतका मोठा साठासापडला आहे की, येत्या काही वर्षांत राज्य देशातील सर्वात मोठे सोन्याचे उत्पादक बनू शकते. या जिल्ह्यात अंदाजे ५० टन सोन्याचा साठा असल्याचा अधिकाऱ्यांचा अंदाज आहे.

रामगिरी, जाववाकुला आणि चिगुरुकुंटा बिस्नाटम यांचा या नवीन क्षेत्रांमध्ये समावेश असून भविष्यात इथे सोन्याचा शोध आणि खाणकाम केले जाईल. त्याचवेळी, जोन्नागिरीमध्ये व्यावसायिक सोन्याचे उत्पादन आधीच सुरू झाल्याची अधिकाऱ्याने पुष्टी केली तर, सुमारे १० वर्षांपूर्वी या गावात सोन्याच्या खाणकामासाठी १५०० एकर जमीन वाटप केली गेली होती.तसेच १५०० एकर जमिनीपैकी ५०० एकर जमिनीवर शोध आणि खोदकाम सुरू झाले असून या क्षेत्रातून अंदाजे १३ टन सोने मिळण्याची अपेक्षा मिळण्याचा प्राथमिक अंदाज आहे तर, उर्वरित १००० एकर क्षेत्रावरील सोन्याच्या शोधाचे काम अद्याप बाकी आहे, जे लवकरच सुरू होईल आणि काम पूर्ण झाल्यावर केवळ जोन्नागिरीमधून ५० टन सोने मिळण्याची शक्यता आहे. लक्षात घ्या की याआधी एक टन कच्च्या मालातून केवळ१ ग्रॅम सोने काढले जाते तर याआधी ३ ग्रॅम सोने मिळायचे. अशाप्रकारे, जोन्नागिरी येथील ५० टन सोन्याच्या साठ्याच्या किंमत अंदाजे ७५०० कोटी ते ९००० कोटी रुपयेदरम्यान असेल. सोन्याच्या किंमतीत दररोज बदल होतात त्यामुळे आकड्यात बदल होऊ शकतो. तसेच इतक्या मोठ्या प्रमाणात सोन्याचा साठा सापडल्यानंतर आता देशांतर्गत सोन्याच्या उत्पादनाला चालना मिळणे अपेक्षित आहे.



गेल्या एका वर्षात सोन्याच्या किमतींनी आस्मान गाठले आहे तर, अजूनही जगातील मध्यवर्ती बँका सातत्याने सोन्याची खरेदी करून आपली तिजोरी भरत आहेत. या दरम्यान, भारतातील राज्य खाण विभागाचे सचिव मुकेश कुमार मीना यांनी पत्रकार परिषदेत जोन्नागिरी व्यतिरिक्त राज्य सरकारने सोन्याच्या खाणकामासाठी आणखी ४ संभाव्य क्षेत्रे निश्चित केल्याची माहिती जाहीर केली.

## पवनराजे निंबाळकर खून खटल्यात पद्मसिंह पाटलांसह सर्व आरोपी निर्दोष

तभा वृत्तसेवा

मुंबई : दोन दशकांपूर्वी महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळाला हादरवून सोडणाऱ्या पवनराजे निंबाळकर हत्याकांडाचा अखेर २० वर्षांनंतर निकाल लागला. या बहुचर्चित प्रकरणाची संपूर्ण भिस्त ज्या माफीच्या साक्षीदाराच्या जबाबावर उभी होती, त्याची साक्ष संशयास्पद आणि अविश्र्वासार्ह ठरवत विशेष सीबीआय न्यायालयाने माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व नऊ आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

गुन्ह्याचा पायाच अत्यंत ठिसूळ असून, माफीचा साक्षीदार सोयीनुसार सतत बदलणारे जबाब देत आल्यामुळे त्याच्या विधानाच्या आधारे कोणालाही दोषी ठरवले जाऊ शकत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने शनिवारी सर्व आरोपींना दोषमुक्त केले.

२००६ पासून प्रलंबित असलेल्या या खटल्याच्या निकाल वाचनाच्या वेळी माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील, त्यांचे सुपुत्र आणि भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील तसेच मृत पवनराजेंचे सुपुत्र खासदार ओमराजे निंबाळकर आपल्या कुटुंबीयांसह न्यायालयात उपस्थित होते. न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष सोडल्याने निंबाळकर कुटुंबीयांच्या पदरी मोठी निराशा आली असून, या विशेष न्यायालयाच्या निकालाविराधात केंद्रीय अन्वेषण ब्यूरो (सीबीआय) आता वरिष्ठ न्यायालयात अपील करणार आहे.



या निकालानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा केली असून, अमित शाह यांनी सीबीआयला वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.एका जननेत्याची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या होते, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे, मात्र न्यायालय केवळ कायद्याच्या चौकटीत राहून आणि पुराव्यांच्या आधारेच निवाडा करू शकते, असे न्यायालयाने सुरुवातीलाच स्पष्ट केले. ३ जून २००६ रोजी नवी मुंबईतील कळंबोली येथे पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे चालक समद काझी यांची गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली होती. सुरुवातीला कळंबोली पोलीस आणि त्यानंतर नवी मुंबई गुन्हे शाखेकडून तपास झाल्यानंतर हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आले. दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत रायगड कोर्टात चाललेला हा खटला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने मुंबईतील विशेष न्यायालयात वर्ग करण्यात आला. या प्रदीर्घ प्रवासात अनेक सरकारी वकील बदलले, शेकडो जाब जबाब झाले आणि अखेर १२७ साक्षीदारांच्या तपासणीनंतर या खटल्याचा निकाल लागला. तपासादरम्यान पारसमल जैन नावाचा आरोपी माफीचा साक्षीदार म्हणून पुढे आला आणि संपूर्ण खटल्याची दिशा बदलली. मात्र, न्यायालयीन छाननीत हाच माफीचा साक्षीदार सरकारी पक्षाच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण ठरला.न्यायालयाने नोंदवलेली निरीक्षणे- न्यायालयाने नोंदवले की, २००२ च्या निवडणुकीत पवनराजे निंबाळकर यांचा पराभव झाल्यानंतर त्यांच्यात आणि पद्मसिंह पाटील यांच्यात तीव्र राजकीय दरी निर्माण झाली होती. पवनराजेंनी २००३ मध्येच जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून आपल्या जीवाला धोका असल्याचे कळवले होते, ज्यामुळे ही हत्या पूर्ववैमनस्यातून आणि राजकीय हेतूने झाल्याचे सकृतदर्शनी समोर येत होते. परंतु, हा गुन्हा सिद्ध करण्यासाठी सीबीआयने उभा केलेला पारसमल जैन हा माफीचा साक्षीदार अत्यंत कमकुवत ठरला. गुन्हे शाखेने जैन याला मुंब्रा येथून ताब्यात घेतले होते, मात्र त्याला अधिकृत अटक न दाखवता त्याच्यावर नंतर तीन वेगवेगळे गुन्हे नोंदवून पोलीस कोठडी घेण्यात आली.या काळात त्याला १५ दिवस बेदम मारहाण करण्यात आली, त्याची औषधे बंद करण्यात आली आणि दबावाखाली त्याचा कबुलीजबाब नोंदवण्यात आला, जे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. याशिवाय, जैन याने न्यायालयात नोंदवलेले दोन कबुलीजबाब एकमेकांशी अजिबात जुळत नाहीत. पहिल्या जबाबापेक्षा दुसऱ्या जबाबातील माहितीमध्ये प्रचंड तफावत असून बारकाईने पाहिल्यास केवळ पुरावे जोडण्यासाठी हे मुद्दे नंतर घुसवल्याचे स्पष्ट दिसते. जैन याने नंतर स्वतःच मारहाण आणि कुटुंबीयांना जीवे मारण्याच्या धमकीमुळे जबाब दिल्याचे अर्ज केले होते, तसेच घटनेच्या दिवशी तो राज्यात नव्हता असे त्याच्या नातेवाईकांनी सांगितले होते. त्यामुळे वेळोवेळी साक्ष बदलणारा हा साक्षीदार विश्र्वासार्ह नसल्याचे सिद्ध होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पाकिस्तानी संदर्भात व्हिडिओ व्हायरल प्रकरणी किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलवर कारवाईची मागणी; सकल हिंदू समाजाचे पोलीस अधीक्षकांकडे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात झालेल्या कथित देशविघातक कृत्यांबाबत संबंधित शाळेचे संचालक, प्राचार्य, शिक्षक व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी हिंदू समाजाचे निवेदन पोलीस अधीक्षक, यांना देण्यात आले आहे.

हिंदू समाजाने दिलेल्या निवेदनानुसार, शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमादरम्यान काही विद्यार्थिनींनी हातात तलवारी घेऊन तसेच इस्लामिक पोशाख परिधान करून एका गाण्यावर मंचावर नृत्य सादर केले. या गाण्यातील शब्द देशविघातक असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच कार्यक्रमाच्या वेळी मंचावरील स्क्रीनवर दहशतवादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुमताज कादरी याचा फोटो, आयएसआयएसशी संबंधित



असल्याचा दावा करण्यात आलेले पोस्टर तसेच पाकिस्तानच्या राष्ट्रीय ध्वजासारखा दिसणारा ध्वज दाखविण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

लहान मुलांचा वापर करून दहशतवादी संघटनांचे किंवा अतिरेकी विचारांचे उदात्तीकरण करण्यात आल्याचा आरोप करत संबंधितांवर तातडीने गुन्हा दाखल करून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या प्रकरणामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून पोलीस प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. मात्र, निवेदनातील आरोपांची स्वतंत्रपणे पडताळणी होणे अद्याप बाकी आहे. परतूर तालुक्यातील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात कथितपणे देशविघातक व दहशतवादाचे समर्थन करणारे सादरीकरण करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित शाळेचे संचालक, प्राचार्य, शिक्षक व कर्मचाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जालना येथील सकल हिंदू समाजाने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनानुसार, शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात काही विद्यार्थिनींनी हातात तलवारी घेऊन व विशिष्ट पोशाख परिधान करून एका गाण्यावर नृत्य सादर केले. या गाण्यातील शब्द देशविघातक स्वरूपाचे असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच मंचावरील स्क्रीनवर दहशतवादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुमताज कादरी याचे छायाचित्र, आयएसआयएसशी संबंधित असल्याचा दावा करण्यात आला .

## संक्षिप्त

### परतूरकरांसाठी सुवर्णसंधी : कोठाळकर हॉस्पिटलतर्फे २१ जून रोजी भव्य मोफत सर्व रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांना उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा एकाच छताखाली मिळाव्यात या उद्देशाने, येथील प्रसिद्ध 'कोठाळकर हॉस्पिटल क्रिटीकेअर व दातांचा दवाखाना' (आय.सी.यू. / ट्रॉमा व इमर्जन्सी सेंटर) च्या वतीने भव्य 'मोफत सर्व रोग निदान व उपचार शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, दि २१ जून २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले असून, परिसरातील नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कोठाळकर हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये जालना आणि परतूर येथील विविध रोगांवरील तज्ज्ञ व नामांकित डॉक्टर रुग्णांची मोफत तपासणी व उपचार करणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने हृदयरोग तज्ज्ञ डॉ. विष्णू एच. भुते, आर. व्ही. मेडीकेअर, जालना), मेंदू विकार तज्ज्ञ डॉ. प्रल्हाद धारूरकर, न्यूरे सर्जरी, परिनिका न्युरोकेअर, जालना), अस्थिरोग व फ्रॅक्चर तज्ज्ञ डॉ. अरविंद म्हस्के, विघ्नहर्ता हॉस्पिटल, जालना), किडनी विकार तज्ज्ञ डॉ. संदीप प. देशमुख, आशुतोष हॉस्पिटल, जालना), डॉ. सतिश चव्हाण, चव्हाण हॉस्पिटल, परतूर), डॉ. अर्जुन अ. साबळे आणि दंत व मुख रोग तज्ज्ञ डॉ. शितल अ. साबळे हे आपली तज्ज्ञ सेवा देणार आहेत.

या शिबिरादरम्यान रुग्णांची मोफत रक्तदाब, शुगर आणि ई.सी.जी. तपासणी केली जाणार असून विविध आजारांवर उपचार व निदान करण्यात येईल. यामध्ये २४ तास ऑक्सिजन सुविधा, सुसज्ज आय.सी.यू. विभाग, आपत्कालीन विभागात हृदयविकार निदान व उपचार तसेच सर्पदंश व विंचूदंश यांसारख्या विषबाधेवर तातडीचे उपचार केले जातील. यासोबतच पॅरालिसिस व फिट्स येणे यांसारखे मेंदूविकार, दमा, टी.बी. व छातीत पाणी होणे यांसारखे फुफ्फुसाचे आजार, साथीचे रोग, पोटात पाणी होणे यांसह पोटाचे विकार आणि किडनीच्या आजारांवर विशेष उपचार व मार्गदर्शन केले जाईल. तसेच हॉस्पिटलमध्ये २४ तास लॅबोरेटरी आणि औषधींची सोय देखील उपलब्ध असेल.

या शिबिरात दातांच्या आजारांवरही अत्याधुनिक दंत उपचार उपलब्ध आहेत. यामध्ये डिजिटल एक्स-रे मशीन, अत्याधुनिक पद्धतीचे रोटरी, सिस्टीम रूट कॅनाल, अल्ट्रासोनिक मशीनद्वारे दात साफ करणे, दात व हिरड्यांचे सर्व उपचार आणि जबड्याच्या सर्व शस्त्रक्रियांची उत्तम सुविधा दिली जाईल.

हे शिबिर 'कोठाळकर हॉस्पिटल क्रिटीकेअर व दातांचा दवाखाना, परतूर-वाटूर रोड, रेल्वे स्टेशन जवळ, बालाजी नगर, परतूर जि. जालना' येथे संपन्न होणार आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी नागरिकांनी ८४८२९४७५९४ किंवा ९६३७२१३९६९ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजक डॉ. अर्जुन साबळे व डॉ. शितल साबळे यांनी केले आहे. आरोग्य सुविधेपासून वंचित असलेल्या गरजू रुग्णांसाठी हे शिबिर अत्यंत फायदेशीर ठरणार आहे.

### विभागीय उपसंचालक कैलास दातखिळ यांच्या हस्ते राजर्षी शैक्षणिक संकुलात शालेय साहित्याचे वाटप!



**तभा वृत्तसेवा**
**पारध । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे आणि ग्रामीण भागातील शिक्षणाची गुणवत्ता अधिक उंचावणे या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षण विभागीय उपसंचालक श्री कैलासजी दातखिळ यांनी भिलदरी बहुउद्देशीय संस्था संचालित राजर्षी शैक्षणिक संकुल, पारध येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री दातखिळ यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधून त्यांच्या शैक्षणिक अडचणी, उद्दिष्टे व भविष्यातील योजनांची माहिती घेतली. त्यानंतर शिक्षक व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने केलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले. यावेळी बोलताना त्यांनी शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास आणि करिअर मार्गदर्शनाशी संबंधित विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजर्षी शाहू कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अमोल बांडगे यांनी केले. तर आभार मुख्याध्यापक विवेक अवसरमोल यांनी मानले. यावेळी राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजाराम डोईफोडे, कार्यालयीन अधीक्षक किशोर वाघ, महर्षी पराशर ऋषी इंग्लिश स्कूलचे प्राचार्य अमोल लोखंडे, ज्येष्ठ शिक्षक विलास लोखंडे, प्रा. धनराज भोसले, प्रा. राजू धनवई, प्रा. लक्ष्मण खरात, मंगेश लोखंडे, दिनेश कापरे, प्रा. अनिल मगर, निलेश लोखंडे, विवेक पराड, स्वप्निल वाघ, अनिल लक्कस, निलेश लोखंडे, साधना टेकाळे, लता अवसरमोल, आरती लोखंडे , सोनाली कोळसे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठवाड्यात पाण्याचे संकट आणि पत्र्यांच्या शाळांमुळे विद्यार्थी, शिक्षक हैराण!



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद । प्रतिनिधी**

विदर्भ वगळता संपूर्ण महाराष्ट्रात १५ जूनपासून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली आहे. मात्र, यंदा 'अल निनो'च्या प्रभावामुळे जून महिना अर्धा संपला तरी उन्हाचा कडाका कायम असून, जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात तापमान३८- ४० अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदवले जात आहे. या तीव्र उष्णतेमुळे आणि उमळणाऱ्या उन्हाच्या झळांमुळे शालेय विद्यार्थी कमालीचे त्रस्त झाले असून, जालना जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळा दुपारऐवजी सकाळच्या सत्रात घेण्यात याव्यात, अशी तीव्र मागणी आता पालक वर्गातून केली जात आहे.

सध्या संपूर्ण मराठवाड्यात पाणीटंचाईचे सावट आहे. जालन्यातील बहुतांश शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न भेडसावत आहे. त्यातच ग्रामीण तसेच निमशहरी भागातील अनेक शाळांच्या इमारती या कमी उंचीच्या असून, त्यावर सिमेंट किंवा लोखंडी पत्राचे छप्पर आहे. दुपारच्या वेळी हे पत्रे प्रचंड तापत असल्याने वर्गखोल्या

> राज्याच्या शालेय शिक्षणमंत्र्यांनी या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल घ्यावी. अल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली उष्णतेची लाट आणि पाण्याची टंचाई लक्षात घेऊन संपूर्ण मराठवाड्यातील आणि विशेषतः जालना जिल्ह्यातील शाळांच्या वेळेत बदल करण्याचे आदेश जारी करावेत.
>
> **-सदानंद लोखंडे**, जिल्हा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समिती जालना

अक्षरशः 'भट्टी'सारख्या गरम होत आहेत. या असह्य उन्हामुळे लहान मुलांना चक्कर येणे, डिहायड्रेशन होणे आणि उलट्या होण्याचा त्रास होत आहे. केवळ विद्यार्थीच नव्हे, तर शिक्षकही या वातावरणाने हैराण झाले आहेत.दुपारच्या सत्रात मुलांना शाळेत पाठवणे म्हणजे त्यांच्या आरोग्याशी खेळण्यासारखे आहे, अशी भीती पालकांकडून व्यक्त होत आहे.

सध्याची उष्णता पाहता दुपारच्या शाळा मुलांसाठी त्रासदायक ठरत आहेत. जोपर्यंत पाऊस सक्रिय होत नाही आणि तापमान कमी होत नाही, तोपर्यंत जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या शाळा सकाळच्या सत्रात . सकाळी ८ते दुपारी १२ अशी वेळ कराव्यात, अशी मागणी पालकांनी केली आहे. आता या वाढत्या जनभावनेची दखल घेऊन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री आणि स्थानिक प्रशासन शाळांच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## ढासला/पिरवाडीचा राज्यभर गौरव! 'महाराष्ट्र रत्न' पुरस्कार गावकऱ्यांना समर्पित

**हा माझा नव्हे, संपूर्ण गावाच्या सामूहिक श्रमांचा सन्मान - आदर्श सरपंच राम पाटील**

**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर । प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यातील ढासला/पिरवाडी गावाचे आदर्श सरपंच राम पाटील यांना नालंदा ऑर्गनायझेशन तर्फे प्रदान करण्यात आलेला प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र रत्न' राज्यस्तरीय पुरस्कार नुकताच पुणे येथे प्रदान करण्यात आला. या सन्मानानंतर सरपंच राम पाटील यांनी हा पुरस्कार संपूर्ण गावाला समर्पित करत, हा माझा वैयक्तिक सन्मान नसून ढासला/पिरवाडीच्या प्रत्येक ग्रामस्थाच्या घाम, कष्ट आणि एकजुटीचा गौरव आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केली.

राम पाटील म्हणाले की, गावाचा विकास हा कोणत्याही एका व्यक्तीच्या प्रयत्नातून शक्य होत नाही. त्यामागे ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांचे अथक परिश्रम असतात. या यशात उपसरपंच विजय पट्टेकर, ग्रामविकास अधिकारी श्री. बोकन, अशोक नाईक, मनोज गडगीळे, नोडल अधिकारी गायकवाड मॅडम, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर्स, रोजगार सेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, पुरुष मंडळ, नवतरुण मित्र मंडळ तसेच गावातील महिलांचे विशेष योगदान असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. मुख्यमंत्री पंचायत राज अभियानांतर्गत 'आदर्श सरपंच', त्यानंतर 'जीवनगौरव पुरस्कार' आणि आता 'महाराष्ट्र रत्न' असा सलग सन्मान मिळणे ही गावासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.



हे सर्व पुरस्कार गावकऱ्यांच्या विश्वास, सहकार्य आणि सामूहिक प्रयत्नांचे फलित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गावाच्या विकासासाठी उन्हा-पावसाची पर्वा न करता रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या प्रत्येक ग्रामस्थाचा या पुरस्कारात सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या विश्वासामुळेच मला नवनवीन विकासकामे करण्याची प्रेरणा मिळते. हा सन्मान माझी जबाबदारी अधिक वाढवणारा असून, भविष्यातही अधिक निष्ठेने, पारदर्शकपणे आणि विकासाभिमुख काम करण्यासाठी प्रेरणा देणारा आहे, असे राम पाटील यांनी सांगितले. ढासला/पिरवाडी गावाने सामूहिक प्रयत्नांच्या बळावर महाराष्ट्रात आदर्श गाव म्हणून वेगळी ओळख निर्माण केली असून, या राज्यस्तरीय सन्मानामुळे गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. ग्रामस्थांमध्ये या पुरस्काराबद्दल आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून राम पाटील यांचे अभिनंदन होत आहे.

## पिंपळगाव रेणुकाई : लोकमान्य नगरजवळ रस्त्याचे काम बंद, धुळीने नागरिक हैराण!

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील लोकमान्य नगर परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्याचे काम बंद पडले आहे. अर्धवट खोदलेल्या रस्त्यामुळे आणि मुरूम उघडा पडल्याने परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

लोकमान्य नगर हा रहदारीचा भाग आहे. शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक, दुकानदार आणि महिला वर्गाला ये-जा करताना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.आणि त्यातच हा रस्त्याच्या दुतर्फा येथील ग्रामस्थांचे निवारे आहे सकाळ-संध्याकाळ वाहनांमुळे उडणाऱ्या धुळीने घरांमध्ये, दुकानांमध्ये धूळ साचत आहे. अनेकांना श्वसनाचे विकार, डोळ्यांची जळजळ, आणि ॲलर्जीचा त्रास सुरू झाला आहे. या परिसरातील महिला म्हणाल्या.

या धुळीमळे स्वयंपाक करणे, कपडे वाळत घालणेही मुश्किल झाले आहे. लहान मुलांना खोकला आणि दम्याचा त्रास वाढला आहे. कामाला सुरवात होत नसेल तर दिवसातून दोन



वेळा तरी या रस्त्यावर पाणी मारावे त्यामुळे उडणारी धुळ थांबुन. आम्हाला व आमच्या लेकरांना होणारा त्रास कमी होईल. स्थानिक नागरिकांनी सांगितले की,दोन महिन्यांपूर्वी रस्त्याचे काम सुरू झाले होते. मुरूम खडी टाकून रस्त्याचे काम तयार करणे चालू होते दोन महिन्यापासून काम अचानक बंद पडले. कॉन्ट्रॅक्टरने साहित्य तसेच टाकून काम अर्धवट सोडले आहे. हा सर्व प्रकार ग्रामपंचायतला महिती असुन सुद्धा ग्रामपंचायत प्रशासन या विषयात लक्ष घालायला तयार नाही. धुळीच्या त्रासाला कंटाळलेल्या नागरिकांनी तातडीने रस्त्याचे काम सुरू करावे, अशी मागणी केली आहे. जोपर्यंत काम चालू होत नाही.तोपर्यंत दिवसातून किमान दोन वेळा टँकरने पाणी मारण्यात यावे, जेणेकरून धुळीचा त्रास कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. याबत पिंपळगाव रेणुकाई ग्रामपंचायत, पंचायत समिती भोकरदन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लक्ष घालून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी लोकमान्य नगर येथील रहिवासी नागरिकांनी केली आहे.अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सुध्दा नागरिकांनी दिला आहे. या वस्तीतुन जवळपास दोन महिन्यापासून रोडचे काम बंद करण्यात आले त्यावर एका बाजुने खडी टाकून ठेवली आणि एका बाजूने मुरुम माती. त्यावरून जाणाऱ्या वाहनाने पूर्ण दिवस धुळीच्या त्रासाने डोळ्यांना जळजळ होत असुन लहान मुले व वृद्ध माणसे यांना श्वसनाचा आजार जडण्याची शक्यता निर्माण झाली आहे .काम बंद आहे तोपर्यंत दिवसातून दोन वेळा या बंद अवस्थेत असलेल्या रोड वर टॅन्करद्वारे पाणी मारुन येथील नागरिकांना या उडणार्या धूळीपासुन होणार्या त्रासापासून मुक्त करावे अशी मागणी पिंपळगाव रेणुकाई (लोकमान्य नगर )येथील रहिवासी ग्रामस्थ महिला व पुरुषाकडून केली जात आहे.

## संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनेचे अनुदान रखडल्याने लाभार्थ्यांचे हाल

**वानखेडे यांचे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन**

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील संजय गांधी निराधार आणि श्रावण बाळ योजनेतील हजारो लाभार्थ्यांना गेल्या काही महिन्यांपासून अनुदानासाठी मोठी वाट पाहावी लागत आहे. सरकारी धोरणानुसार दरमहा १ ते ५ तारखेच्या आत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा होणे अपेक्षित असताना, प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळीच आहे. याबाबत माँ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब शिवाजीराव वानखेडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, एप्रिल २०२६ महिन्याचे अनुदान काही लाभार्थ्यांना मिळाले. तर अनेकांना अद्याप मिळालेले नाही. तसेच, मे २०२६ महिन्याचे अनुदान तर लाभार्थ्यांच्या खात्यावर जमाच झाले नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.या योजनेतील बहुतांश लाभार्थी हे वृद्ध, निराधार आणि दिव्यांग आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना आणि दैनंदिन गरजांसाठी त्यांना पूर्णपणे या अनुदानावर अवलंबून राहावे लागते. सध्याच्या महागाईच्या काळात वेळेवर पैसे मिळत नसल्यामुळे अनेक महिला लाभार्थ्यांना उसणवारी करून घरखर्च चालवावा लागत आहे. धोंडे जेवणासारख्या सणासुदीच्या काळातही खिशात पैसे नसल्याने त्यांना कर्ज काढून सण साजरा करावा लागल्याची हृदयद्रावक माहितीही या निवेदनात दिली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्र्यांनी विधानसभेत घोषणा केली होती की, संजय गांधी निराधार, श्रावण बाळ आणि दिव्यांग योजनेचे अनुदान दरमहा १ ते ५ तारखेच्या आत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केले जाईल. मात्र, जालना जिल्ह्यात या घोषणेची अंमलबजावणी होत नसल्याने गोरगरिबांचा विश्वास डळमळीत होत आहे. अनुदान वेळेवर मिळत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. तरी, प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घ्यावी आणि सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून थकीत अनुदान तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करावे, अशी मागणी बाबासाहेब वानखेडे यांनी केली आहे.

## शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर लगाम घालण्यासाठी माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे यांनी घेतली पोलीस अधीक्षकांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आज माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांची भेट घेऊन शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक कडक करण्याची मागणी केली. यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, भाजप



जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, बद्रीनाथ पठाडे, युवानेते अक्षय भैया गोरंटयाल यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दत्तनगर परिसरातील सिंधी कॉलनी येथे घडलेल्या दगडफेक प्रकरणासह शहरातील विविध भागांमध्ये सातत्याने घडणाऱ्या चोरी, मारहाण, दहशत निर्माण करण्याचे प्रकार आणि इतर गुन्हेगारी घटनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरात वाढत्या गुन्हेगारीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, गुन्हेगारांवर तातडीने आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी शहरातील संवेदनशील भागांमध्ये पोलीस गस्त वाढविणे, रात्रीच्या वेळी विशेष पथके तैनात करणे, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे, सीसीटीव्ही यंत्रणांचा वापर करणे आणि शहरात पोलिसांचा वचक अधिक प्रभावीपणे निर्माण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत शहरातील कायदा व सुव्यवस्था मजबूत करण्याची आवश्यकता आहे, दत्तनगर येथील सिंधी कॉलनीतील दगडफेक प्रकरणामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डॉ. जनार्दन वाघमारे यांचे स्मारक उभारण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि.२० जून : मराठवाड्यातील नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांचे स्मारक विद्यापीठ परिसरात उभारण्याची मागणी शुक्रवारी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांना डॉ. जनार्दन वाघमारे विचार मंचच्या शिष्टमंडळाने भेटून केली.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवून मराठवाड्यातील उच्च शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करणारे संस्थापक कुलगुरु, थोर शिक्षणतज्ञ कै. डॉ. जनार्दन वाघमारे यांचे कार्य अजरामर आहे. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय योगदानाची जाणीव पुढील पिढ्यांना व्हावी व त्यातून प्रेरणा मिळावी या हेतूने विद्यापीठ परिसरात त्यांचे स्मारक उभारण्याची मागणी केली आहे. १७ सप्टेंबर १९९४ रोजी मराठवाड्यातील उच्च शिक्षणाच्या विकेंद्रीकरणासाठी स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. स्थापना काळात अनेक प्रशासकीय व शैक्षणिक आव्हाने असताना डॉ. जनार्दन वाघमारे यांनी संस्थापक कुलगुरु म्हणून १७/०९/१९९४ ते १६/०९/१९९९ पर्यंत दूरदृष्टीने काम केले. विद्यापीठाची इमारत, विविध अभ्यासक्रम, महाविद्यालय संलग्नता, नोकरभरती या सर्वांची पायाभरणी अत्यंत मजबूत पध्दतीने त्यांनी केली. त्यांचे स्मारक हे केवळ व्यक्तीचे स्मारक नसून विद्यापीठाच्या निर्मिती पर्वाचे प्रतिक ठरेल. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे संस्थापक कुलगुरु म्हणून त्यांचे आधुनिक अशा पध्दतीचे स्मारक उभा करुन तरुण पिढीला प्रेरणा देण्यात यावी अशी मागणी डॉ. जनार्दन वाघमारे विचार मंचच्या शिष्टमंडळाने केली आहे.



## विविध वृत्त...

### प्रा. काशिनाथ हिरामण राठोड यांना पीएच.डी. प्रदान



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २० जून : तालुक्यातील बोरसुरी येथील आर्य शिक्षण संस्था, बोरसुरी द्वारा संचलित आर्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरसुरी येथे कनिष्ठ महाविद्यालय विभागात अर्थशास्त्र व इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणून सन २०१३ पासून कार्यरत असलेले प्रा. काशिनाथ हिरामण राठोड यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी अर्थशास्त्र विषयातील संशोधन कार्याबद्दल विद्यावाचस्पती (झह.ऊ) ही सर्वोच्च पदवी प्रदान केली आहे.

प्रा. राठोड यांनी लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास (कालावधी : २०१३ ते २०२३) या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला होता. या संशोधन कार्यासाठी महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. एस. देवनाळकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

प्रा. राठोड यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल आर्य शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आर्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. हेमंत हरिश्र्चंद्र तोकले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रा. राठोड यांच्या या यशामुळे बोरसुरी, निलंगा व लातूर जिल्ह्याच्या

### माजी विद्यार्थी ओझर सरफराज मलकजी यांचा उदयगिरी महाविद्यालयात सत्कार

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २० जून : महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी ओझर सरफराज मलकजी याची हैदराबाद येथील सेल्सफोर्स कंपनीत निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन हा सत्कार करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, पर्यवेक्षक प्रा. संजय मुडपे व प्रा. तिरुपती सगर उपस्थित होते. ओझर सरफराज मलकजी याने बारावीचे शिक्षण महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात पूर्ण केले असून संगणकशास्त्र विषयात आयआयटी, धनबाद येथून पदवी शिक्षण घेतले आहे. महाविद्यालयीन काळात कोणत्याही प्रकारची शिकवणी न लावता केवळ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंअध्ययन व नियमित अभ्यास केल्यामुळे हे यश मिळाल्याचे त्याने सांगितले. विद्यार्थ्यांनी स्वयंअध्ययनाला प्राधान्य देऊन नियमित तासिकांना उपस्थित राहावे, असा संदेशही त्याने दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नागनाथ खांडेकर यांनी केले.

### झाडे लावा, झाडे जगवाचा संदेश

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. २० जून : पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपणाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मंडळ अधिकारी कार्यालय व ग्राम महसूल अधिकारी कार्यालय वलांडी यांच्या वतीने झाडे लावा, झाडे जगवा या संदेशाचा फलक कार्यालयाच्या मंडळ अधिकारी कार्यालयाची पर्यावरण जनजागृती मोहीम प्रवेशद्वारावर लावून जनजागृती करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धनाबाबत सकारात्मक संदेश दिला जात आहे. फलकावर वृक्षांचे पर्यावरणातील महत्त्व, ऑक्सिजन निर्मिती, हवेचे शुद्धीकरण, तापमान नियंत्रण तसेच जैवविविधतेच्या संवर्धनातील योगदान याबाबत माहिती देण्यात आली आहे. आज झाड लावा, उद्या झाडे जगवा हा संदेश देत प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मुंबई - लातूर - बिदर एक्सप्रेसला ३ अतिरिक्त डबे मंजूर : खा. डॉ. काळगे





तभा वृत्तसेवा

लातूर दि. २० जून : लातूर - मुंबई - बिदर एक्सप्रेस रेल्वेला अतिरिक्त तीन डबेमंजूर करण्याच्या मागणीला यश आल्याची माहिती लातूरचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी दिली. रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने लावून धरलेल्या मागणीची पूर्तता झाल्याने काही प्रमाणात प्रवाशांना दिलासा मिळणार असल्याचेही खा. डॉ. काळगे यांनी सांगितले.

यासंदर्भात बोलताना खा. डॉ. शिवाजीराव काळगे म्हणाले की, मुंबई -लातूर -बिदर या गाडीला अतिरिक्त डबे मिळावेत, ही मागणी मी माझ्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीपासून सातत्याने मांडत आलो आहे. खासदार म्हणून निवडून आल्यापासून केंद्रीय रेल्वे प्रशासनाकडे या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला. बिदर स्थानकावरील प्लॅटफॉर्मची लांबी अपुरी असल्यामुळे दक्षिण मध्य रेल्वेकडून हा विषय काही काळ प्रलंबित होता. नुकत्याच सिकंदराबाद विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्या दौऱ्यादरम्यान या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून आता गाडीच्या रचनेत वाढ झाली आहे. त्यानुसार, गाडी क्रमांक २२१०७ / २२१०८ व २२१४३ / २२१४४ मुंबई- लातूर -बिदर सुपरफास्ट एक्सप्रेसमध्ये दि. २५ जून २०२६ पासून ३ अतिरिक्त डबे जोडण्यात येणार आहेत. यामध्ये एक वातानुकुलित द्वितीय श्रेणR(-C 2 TIER ) प्रवासी क्षमता ४६ असेल, एक वातानुकुलित तृतीय श्रेणी (-C 3 TIER) ज्याची प्रवासी क्षमता ६४ असेल व एक शयनयान श्रेणी (SLEEPER CLASS) ज्याची प्रवासी क्षमता ७२ असेल.यामुळे या गाडीची रचना २१ डब्यांवरून २४ डब्यांची होणार असून अधिक प्रवाशांना आरक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या निर्णयाबद्दल आपण केंद्रीय रेल्वे प्रशासन, विशेषतः मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक तसेच दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो, असे खा. डॉ. काळगेयांनी बोलून दाखविले.मात्र, हा पाठपुराव्याचा पहिला टप्पा आहे.

लातूर-बिदर मार्गावरील प्रवाशांना अधिक सुरक्षित, अधिक आरामदायी आणि आधुनिक प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी या गाडीला जुन्या आयसीएफ डब्यांऐवजी अत्याधुनिक व अधिक सुरक्षित एलएचबी डबे उपलब्ध व्हावेत, ही आपली प्रमुख मागणी असून त्यासाठीचा पाठपुरावा यापुढेही पूर्वीप्रमाणेच सातत्याने सुरू राहणार आहे.जनतेच्या हितासाठी आणि लातूर लोकसभा मतदारसंघातील रेल्वे सुविधांच्या विकासासाठी माझे प्रयत्न अविरत सुरूच राहतील,अशी ग्वाहीही खा. डॉ. काळगे यांनी दिली आहे.

## औशातील ७४.४०० किलोमीटर रस्त्यांना प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा
## विकास कामांना मिळणार मोठी गती आ. अभिमन्यू पवार यांचा पाठपुरावा



तभा वृत्तसेवा

औसा दि. २० जून : औसा मतदारसंघातील जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गांसह इतर ग्रामीण मार्गासह राज्य शासनाने प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जा दिल्याने परिसरातील वाहतूक, संपर्क व्यवस्था आणि रस्त्यांच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय मार्गी लागला असून याचा लाभ औसा मतदारसंघातील नागरिकांना होणार आहे. या निर्णयामुळे जिल्हा परिषद मालकीचे असलेले रस्ते आता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित होणार असून त्यांच्या सुधारणा, देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे राहणार आहे.

संबंधित रस्त्यांवरील गावांची संख्या, लोकसंख्या, वाढती वाहतूक वापर आणि ग्रामीण भागातील संपर्क व्यवस्था लक्षात घेऊन शासनाने या मार्गांना प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा बहाल केला आहे. या प्रक्रियेसाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता.या निर्णयामुळे संबंधित रस्त्यांच्या सुधारणा, मजबुतीकरण व देखभालीसाठी राज्य शासनाकडून दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये निधी मंजूर करणे शक्य होणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या दुरुस्ती व विकासकामांना गती मिळणार असून ग्रामीण भागातील नागरिकांना त्याचा मोठा फायदा होणार आहे.

प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जा देण्यात आलेल्या रस्त्यांमध्ये रामा-६८ ते शिवली-भादा-उटी (बु.) हा ७.५०० कि.मी. लांबीचा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ११९ म्हणून घोषित करण्यात आला आहे. तसेच रामा-२३९ ते काळमाथा-उटी (बु.)-लखनगाव-सतधरवाडी मार्गासह संबंधित ग्रामीण व इतर जिल्हा मार्गांचा समावेश करून एकूण १५ कि.मी. लांबीचा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १२० म्हणून घोषित करण्यात आला आहे.औसा-वानवडा-तुंगी (बु.)-मसलगा (खु.)-माळकोंडजी (पु.) ते हसलगन (पु.) हा १५ कि.मी. लांबीचा मार्ग प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १२१ म्हणून दर्जोन्नत करण्यात आला आहे. नागरसोगा-चिंचोली तपसे-चिंचोलीवाडी (पु.) ते जुने किल्लारी हा १८ कि.मी. लांबीचा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १२२ म्हणून घोषित करण्यात आला आहे. तसेच लातूर-शिरसी-हिप्परसोगा-हसेगाव-गोंद्री मार्गाचा औसा व लातूर तालुक्यातील भाग मिळून १५.९०० कि.मी. लांबीचा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १२३ म्हणून दर्जा देण्यात आला आहे.

या सर्व रस्त्यांची एकूण लांबी ७४.४०० किलोमीटर इतकी असून या निर्णयामुळे ग्रामीण भागातील वाहतूक अधिक सुरक्षित, वेगवान व सुलभ होणार आहे. शेतीमालाची वाहतूक, शैक्षणिक व आरोग्य सुविधांपर्यंत पोहोच तसेच गावागावांतील संपर्क व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नियमित देखभाल व आवश्यक दुरुस्ती होणार असल्याने नागरिकांची दीर्घकाळापासूनची मागणी पूर्ण झाली आहे.

औसा मतदारसंघातील या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे भविष्यात रस्त्यांच्या दर्जेदार विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला असून ग्रामीण विकासाला नवी गती मिळणार आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्यामुळे हा निर्णय साकार झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## मिशन क्लीन अँड ग्रीन लातूर अंतर्गत टागोर उद्यानात स्वच्छता ,आयएमएचा पुढाकार



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २० जून : इंडियन मेडिकल असोसिएशन लातूरतर्फे राबविण्यात येत असलेल्या मिशन क्लीन अँड ग्रीन लातूर २०२६ उपक्रमांतर्गत विलासराव देशमुख मार्गावरील रवींद्रनाथ टागोर उद्यान (वर्धमान पार्क) येथे सामूहिक स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले. लातूर महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमात डॉक्टरांसह स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसर स्वच्छतेसह पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

अभियानादरम्यान उद्यान परिसरातील कचरा संकलन, स्वच्छता आणि पर्यावरणाबाबत जनजागृती करण्यात आली. लातूर हे केवळ शहर नसून आपली ओळख आणि सामूहिक जबाबदारी आहे, या भावनेतून स्वच्छ, हरित आणि निरोगी लातूर घडविण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचा संदेशही या अभियानातून देण्यात आला.या उपक्रमासाठी महानगरपालिकेच्या उपायुक्त वसुधा फड, आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, डॉ. आनंद कलमे, डॉ. आकांक्षा त्रिपाठी अवस्थी, डॉ. वेदांत अवस्थी, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. राजेश दराडे, डॉ. वर्षा दराडे, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. शिवपूजे, डॉ. स्नेहल शिवपूजे तसेच ॲड. मीना गायकवाड, सतिष कातपुरे , मुंढे ,अजय जाधव , स्वाती जाधव, उषा नारागुडे, ऋषिकेश कानडे , गायकवाड,उल्हास नारागुडे,यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

## ३ लाख १८ हजार रुपयांचा १२ किलो गांजा केला जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर : जिल्ह्यात अमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात सुरू असलेल्या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत १२ किलो ७४० ग्रॅम गांजा जप्त केला असून दोन आरोपींना रंगेहाथ अटक केली आहे. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे किंमत ३ लाख १८ हजार ५०० रुपये इतकी आहे.

पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशानुसार अमली पदार्थाचे उत्पादन, वाहतूक, साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरू आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. सुधाकर बावकर यांचे पथक लातूर शहरासह परिसरात गस्त घालत होते. दरम्यान, मिळालेल्या माहितीच्या आधारे सारोळा चौक परिसरातील रिंगरोडवर सापळा रचण्यात आला. दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास करण्यात आलेल्या छाप्यात दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले.

## एसटी महामंडळातर्फे विद्यार्थ्यांना मिळणार ‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्ड




तभा वृत्तसेवा

लातूर दि. २० जून : राज्य परिवहन महामंडळातर्फे विविध सामाजिक घटकांना प्रवास भाड्यात देण्यात येणाऱ्या सवलतींसाठी आता आधारकार्ड संलग्न ‘एनसीएमसी अनेब्ल्ड स्मार्ट कार्ड’ वितरीत करण्यात येत आहे. लवकरच शालेय व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सवलतीच्या पासेसकरिताही या कार्डची नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. शासनाच्या ९ ऑक्टोबर २०१८ च्या निर्णयानुसार सवलतधारी प्रवाशांना स्मार्ट कार्ड देण्याचे निश्र्चित करण्यात आले होते. त्यानुसार राज्य परिवहन महामंडळ, मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि एनएसडीएल पेमेंट्स बँक यांच्या संयुक्त विद्यमाने हे कार्ड देण्याची कार्यवाही सर्व आगारांमध्ये सुरू आहे. १६ फेब्रुवारी २०२६ पासून अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला सवलतधारी प्रवाशांसाठी कार्ड नोंदणी व वितरण प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, याच धर्तीवर आता नजीकच्या काळात विद्यार्थ्यांनाही हे स्मार्ट कार्ड दिले जाणार आहे.

शालेय, शैक्षणिक, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता ‘सरल’ व ‘अपार’ क्रमांक संलग्न एनसीएमसी कार्ड प्राप्त होणार आहे. यासाठी हे दोन्ही क्रमांक विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाशी जोडलेले असणे अनिवार्य आहे. शालेय विद्यार्थ्यांना मासिक पासाकरिता लागणाऱ्या या स्मार्ट कार्डचा मागणी अर्ज एसटी महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर मोफत उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या अर्जात नमूद केलेली माहिती व जोडलेली आवश्यक कागदपत्रे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक असून, त्यानंतरच हा अर्ज आगारातील किंवा बसस्थानकावरील वाहतूक नियंत्रक अथवा अधिकृत एजंट यांच्याकडे जमा करावयाचा आहे. या कार्डच्या नोंदणी प्रक्रियेसाठी विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांचा चालू मोबाईल (भ्रमणध्वनी) क्रमांक देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

अर्जाची तपासणी व पडताळणी झाल्यानंतर आवश्यक शुल्क आकारून विद्यार्थ्यांना पावती दिली जाईल. नोंदणी पूर्ण झालेले हे एनसीएमसी कार्ड ३० दिवसांच्या आत प्रिंट करून संबंधित आगारास प्राप्त होईल आणि त्यानंतर आगारामध्ये पॉस (पीओएस) मशिनद्वारे हे कार्ड क्टिव्ह करून ते प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना वितरित केले जाईल.

तरी सर्व संबंधित विद्यार्थी आणि पालकांनी नोंदणी प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रांची आगाऊ पूर्तता करून ठेवावी, असे आवाहन लातूर राज्य परिवहन महामंडळाच्या लातूर विभाग नियंत्रकांनी केले आहे.

## अनुसूचित जाती उपवर्गीकरणासाठी धर्माबाद ते मुंबई पदयात्रा लातूरात दाखल



तभा वत्तसेवा

लातूर दि. २० जून : शोषणमुक्त समाज निर्मितीसाठी लोक स्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ.रामचंद्र भरांडे यांच्या नेतृत्वात पावसाळी अधिवेशनावर दिनांक ११ जून २०२६ ते दिनांक ६ जुलै २०२६ पर्यंत धर्माबाद ते मुंबई पदयात्रा काढून महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती उपवर्गीकरण करून वंचित अनुसूचित जातींना न्याय देण्याबाबत सरकारचे लक्ष वेधण्यासाठी पदयात्रा काढण्यात आले असून ती लातूर येथे दिनांक १८ जून रोजी आली असता पत्रकार परिषदे घेऊन प्रा. डॉ. भरांडे यांनी माहिती दिली.

ते पुढे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाद्वारे राज्यांना अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचा घटनात्मक अधिकार प्रदान केला आहे. या निर्णयामध्ये वास्तविक समानता,अंतरगत मागासलेपणा व अपुरे प्रतिनिधित्व या निकषांना विशेष महत्व देण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या एकसंध नसून त्या विविध स्तरांमध्ये विभागलेल्या आहेत. प्रत्यक्षात काही मोठ्या जातींना आरक्षणाचा मोठा लाभ घेतला असून, मातंग व तत्सम जाती आजही सर्व क्षेत्रात मागे राहिलेल्या आहेत. त्यामुळे उपवर्गीकरण करणे ही काळाची गरज आहे.

भारतातील कर्नाटक या राज्यांने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केली आहे. विशेषतः हरियाणा राज्याने वंचितला आणि अल्प प्रतिनिधीत्व या निकषांवर आधारित दोन गटांची प्रभावी रचना केली आहे.

महाराष्ट्र शासनाकडून उपवर्गीकरण करताना लोकसंख्या किंवा जातवार महामंडळाचा आधार घेतला जात असल्याची माहिती समोर येत आहे. तथापी, असा आधार सर्वोच्च न्यायालयाच्या निकषांशी विसंगत असून, तो घटनात्मक तत्वांना धरुन नाही. उपवर्गीकरणाचा उद्देश आरक्षणाचा लाभ खऱ्या अर्थाने वंचित घटकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. त्यानुषंगाने, महाराष्ट्रातील मातंग समाज पुढीलप्रमाणे उपवर्गीकरणाची योजना शासनास सादर करीत आहे. १. अनुसूचित जातींचे दोन गटात उपवर्गीकरण करण्यात यावे. अ) वंचित अनुसूचित जाती, ब) इतर अनुसूचित जाती २. आरक्षणाचे विभाजन पुढीलप्रमाणे करण्यात यावे :अनुसुचित जातींसाठी असलेल्या १३ टक्के आरक्षणापैकी ६ टक्के आरक्षण वंचित अनुसूचित जातींसाठी राखीव ठेवावे. उर्वरित ७ टक्के इतर अनुसूचित जातीसाठी ठेवण्यात यावे. ३. परस्पर संधी जर एका गटात पात्र उमेदवार उपलब्ध नसेल, तर दुसऱ्या गटातील उमेदवारास संधी देण्यात यावी. ४. सेवा भरतीतील अनुशेष १९६० पासुन वंचित अनुसूचित जातींच्या सेवा भरतीतील अनुशेष तातडीने व प्राधान्याने भरावे. ५. शैक्षणिक व आर्थिक संधी : शैक्षणिक प्रवेशात वंचित अनूसूचित जातीसाठी स्वतंत्र ६ टक्के आरक्षण लागु करावे. विविध शासकीय योजना व उद्योगांमध्ये किमान ६ टक्के संधी राखुन ठेवाव्यात. ६. अंमलबजावणीची कार्यपध्दती : उपवर्गीकरणानंतरची पहिली रिक्त जागा वंचित अनु.जातीसाठी देण्यात यावी. बिंदुनामावलीत कोणताही व्यत्यय येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अधिन राहून वंचित घटकांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र राज्यात तात्काळ अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण लागु करण्यात यावे. मुख्यमंत्री महोदयांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य ती सकारात्मक कार्यवाही कराल अशी आम्हाला खात्री आहे अन्यथा होणाऱ्या परिणामास शासन जबाबदार राहील याची नोंद घ्यावी, असा इशाराही शेवटी या पत्रकार परिषदेत डॉ.प्रा.रामचंद्र भरांडे यांनी दिला आहे. यावेळी व्हि.जी. डोईवाड नारायण कांबळे, संजय दोरवे, गोरख शिंदे,नागनाथ डोंगरे, पिराजी साठे,बालाजी शिंदे, भगवान वाघमारे आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## अग्रलेख

# अशा पक्षात फूटच पडणार हो !

राजकारण आणि पाडापाडी किंवा फुटाफूट यांचे काहीतरी सख्य असावे. भारतीय राजकारणाचा पट पाहिला तर असे दिसेल की, देशात भाजपा वगळता एकही पक्ष असा नाही, जो कधीतरी फुटला नाही. याचे महत्त्वाचे कारण असे की, भाजपा वगळता इतर बहुतांशी पक्ष हे व्यक्तिकेंद्री किंवा परिवारवादी आहेत. इतिहासात असे दिसते की, काँग्रेस आणि जनता दलाचे सर्वाधिक तुकडे झाले. त्यामुळे आज आपल्या देशातील अनेक पक्षांची नावे काँग्रेस आणि जनता दलावरून आहे. काँग्रेसमधून बाहेर पडणारा नेता आपल्या नव्या पक्षाच्या नावात 'काँग्रेस' राहील, याची काळजी घेतो. उदा. तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस. तसाच प्रकार जनता दलाच्या बाबतीतही आहे. जनता दलातून फुटून बाहेर निघालेल्या नेत्यांनी आपल्या पक्षाच्या नावात 'जनता दल' हे शब्द कायम ठेवले आहे. उदा. राष्ट्रीय जनता दल, संयुक्त जनता दल आणि धर्मनिरपेक्ष जनता दल. मूळ पक्षाच्या नावाची गोधडी पांघरल्याशिवाय या नेत्यांना राजकीय अस्तित्व सिद्ध करता येत नसावे. काही नेते तर मूळ पक्षातून बाहेर पडतात आणि मूळ पक्षावर आणि त्याच्या निवडणूक चिन्हावरही दावा करतात. उदाहरणार्थ एकनाथ शिंदे मूळ शिवसेनेतून बाहेर पडले आणि त्यांनी आपला गट हीच मूळ शिवसेना असल्याचा दावा करीत त्या पक्षाचे 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्हही मिळविले. आता त्याच मूळ शिवसेनेत म्हणजे जिचा उल्लेख सध्या उपरोधाने 'शिल्लकसेना' असा केला जातो, तीत आणखी एक फूट पडली आहे आणि त्या फुटीचा ठपका भाजपावर ठेवला जात आहे.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेना नावावरून संभ्रम होऊ नये म्हणून निवडणूक आयोगाने दोन पक्षांचे बारसे केले होते. एकाला शिवसेना-एकनाथ शिंदे तर दुसऱ्याला शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे असे नाव दिले. शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे असे लांबलचक नाव रोज घेणे शक्य नसल्यामुळे तो पक्ष शिवसेना-उबाठा म्हणून ओळखला जाऊ लागला. लोकसभेत शिवसेना-उबाठाचे एकूण नऊ खासदार होते. त्यातील सहा खासदारांनी बाहेर पडत आपल्याला वेगळा गट म्हणून मान्यता देण्याची व नंतर शिवसेना शिंदे गटातील आपल्या विलीनीकरणालाही मान्यता देण्याची विनंती करणारे पत्र लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना दिले आहे. सध्या काही तांत्रिक कारणामुळे शिवसेनेतील ही फूट प्रत्यक्षात आली नसली, तरी ती पडली आहे, हे तर खरेच. पण, या फुटीला त्या पक्षाचे नेतृत्वच कारणीभूत आहे, अन्य कुणीही नाही. राजकारण्यांमध्ये आता पक्षाच्या विचारधारेवर अव्यभिचारी निष्ठा राहिलेली नाही. तत्त्वाचे आणि मूल्यांचे राजकारण करायला आज कोणाला वेळ नाही; सगळेच संधिसाधू झाले आहेत. त्यामुळे फूट पडण्यात नवलाई राहिलेली नाही. नवलाई एवढीच की, कोणत्याही पक्षात फूट पडली तरी त्याचे खापर भाजपावर फोडले जाते. खरे तर भाजपाच्या केंद्रातील सरकारकडे भक्कम बहुमत आहे. भाजपाच्या महाराष्ट्रातील सरकारकडेही तीन चतुर्थांश बहुमत आहे. त्यामुळे भाजपाला कोणताही पक्ष फोडण्याची गरज नाही. तरीही फूट पडत असते. आधी तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडली. आता महाराष्ट्रातील शिवसेना उबाठात फूट पडली. या फुटीचे कारण भाजपा नव्हे तर त्या पक्षाचे नेतृत्व आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांना आपला पक्ष सांभाळता आला नाही. त्यामुळे त्यांच्या पक्षातून आधी ५८ आमदार बाहेर पडले, नंतर २० खासदारांनीही त्या पक्षाला रामराम केला. ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये सलग १५ वर्षे राज्य केले, मुख्यमंत्रिपद सांभाळले. पण, या काळात त्यांची आणि त्यांचा अतिमहत्त्वाकांक्षी भाचा अभिषेक बॅनर्जी यांची वागणूक आपल्या आमदारांना-खासदारांना कस्पटासमान लेखण्याची होती. पक्षाचे आमदार आणि खासदार आपले घरगडी आहेत, अशा पद्धतीने ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी वागत होते. विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर या आमदार आणि खासदारांनी ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी यांना त्यांची जागा दाखवली. कितीही सहन करतो असे म्हटले तरी संधी मिळाल्यावर अपमानाची परतफेड करण्यास माणसं विसरत नाहीत. तेच घडले. शिवसेना उबाठातील फुटीमागेही तृणमूलप्रमाणे हेच महत्त्वाचे कारण आहे. उद्धव ठाकरे यांना आपला पक्ष सांभाळता आला नाही आणि आपले आमदार-खासदारही जपता आले नाहीत. पक्षातून एखाद्दुसऱ्या नेत्याने बाहेर पडणे आणि पक्षात फूट पडणे यात फरक आहे. शिवसेनेतून यापूर्वीही अनेक नेते बाहेर पडले. तेव्हा भाजपावर कोणताही आरोप झाला नाही. कारण भाजपा हा तेव्हा शिवसेनेचा मित्रपक्ष होता. आता तशी स्थिती राहिलेली नाही. आता उबाठा गटात खुट्ट जरी वाजले तरी भाजपाला दोष दिला जातो. आपल्याला घर सांभाळता येत नाही, हे उद्धव ठाकरे आणि त्यांची पालखी वाहणाऱ्यांना दिसत नाही.

२०२२ मध्ये एकनाथ शिंदे ४० आमदारांसह बाहेर पडले त्यावेळी शिवसेनेला सरकार गमवावे लागले. मुख्यमंत्री असलेल्या उद्धव ठाकरे यांना राजीनामा द्यावा लागला. तेव्हाही भाजपाला दोष दिला गेला. आपले दरबारी राजकारण आपल्याला भोवते आहे, याकडे दुर्लक्ष केले गेले. आता पुन्हा फूट पडली. पुन्हा फुटीचे खापर भाजपावरच फोडले जात आहे. वास्तवात या दोन्ही फुटींना स्वतः उद्धव ठाकरे आणि त्यांचे चिरंजीव आदित्य ठाकरे जबाबदार आहेत. उद्धव ठाकरे हे हस्तिदंती मनोऱ्यातील राजकारणी आहेत. त्यांच्याकडे बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखा करिश्मा नाही. त्यांच्यासारखे नेतृत्व आणि वक्तृत्वही नाही. मुख्यमंत्रिपदाची ओढून-ताणून आणलेली संधी उद्धव ठाकरेंना मिळाली होती. पण कोणतीही जबाबदारी न घेण्याच्या स्वभावामुळे त्यांनी त्या संधीचे सोने करण्याऐवजी माती केली. मुख्यमंत्री म्हणून मंत्रालयात सर्वांत कमी वेळा गेलेले महाराष्ट्रातील एकमेव नेते म्हणजे उद्धव ठाकरेच असावेत. राज्यातील जनतेला तर सोडाच; पण आपल्या पक्षाच्या आमदार आणि खासदारांनाही उद्धव ठाकरे भेटत नाहीत. सामान्य शिवसैनिकांचा तर प्रश्नच उद्‌भवत नाही. खरा नेता तोच असतो, जो आपल्या कार्यकर्त्यांना भेटत असतो, आमदार-खासदारांच्या संपर्कात असतो, त्यांचे प्रश्न आणि समस्या सोडवत असतो. उद्धव ठाकरे यांना यातले काहीच जमले नाही. आपल्या कार्यकर्त्यांसाठी नेता सदैव उपलब्ध असला पाहिजे, त्यांच्यासाठी धावून गेला पाहिजे. उद्धव ठाकरेंनी अन्य पक्षातील नेत्यांच्या स्वभावाचा आणि आचरणाचा अभ्यास केला पाहिजे. कधी काळी मित्रपक्ष राहिलेल्या भाजपाचे नेते कार्यकर्त्यांना, लोकप्रतिनिधींना कसे वागवितात, हे त्यांनी नव्याने पाहिले पाहिजे. पण, उद्धव ठाकरेंची वागणूक एखाद्या महाराजाला साजेशी आहे. बाळासाहेबांचे वारसदार या नात्याने शिवसेनाप्रमुख म्हणून त्यांचा राज्याभिषेक झाला. हे पद त्यांना कर्तृत्वाने नव्हे तर वारशाने मिळाले. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना राज्यातील गोरगरीब जनतेच्या प्रश्नांशी आणि समस्यांशी कधीच देणेघेणे नव्हते. विशेष म्हणजे उद्धव ठाकरे यांनी आपल्या भोवती संजय राऊत यांच्यासारखे सल्लागार गोळा केले आहेत. नेत्याने ऐकायचे सर्वांचे, पण करायचे आपल्या मताने अशी पद्धत आहे. उद्धव ठाकरे आपल्या लोकप्रतिनिधींना आणि कार्यकर्त्यांना भेटतच नसतील तर त्यांना राजकारणात नेमके काय चालले आहे हे कसे कळणार? भाजपाला दोष देणे सर्वांत सोपे आहे. पण, अशा दोषारोपणातून त्यांचा पक्ष सुधारत नाही. तो अधिक व्यक्तिकेंद्रित होत जातो. कारण सभोवतालच्या व्यक्ती कमी होत जातात. उबाठा गटाचे तसेच झाले आहे. तृणमूल काँग्रेसचेही तेच झाले आहे. अशा पक्षांत फूट पडणार नाही तर दुसरे काय होणार हो? ■

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# ऑपरेशन शिव्या

१२ जून रोजी महाराष्ट्राने एका महान साहित्यिकाचा, महाराष्ट्राच्या लाडक्या व्यक्तिमत्त्वाचा पु. ल. देशपांडे यांचा स्मृतिदिन साजरा केला. पुलं या दोन अक्षरात महाराष्ट्राच्या साहित्यिक संस्कृतीचा गाभा सामावलेला आहे. पुलंच्या विनोदात एक सोज्वळता होती, एक मार्दव होतं, जे आजही मनाला भिडतं. आजच्या काळात जिथे कोणाच्या तरी वैयक्तिक जीवनावर गलिच्छ टीका करणे म्हणजे विनोद असं समजलं जातं, तिथे पुलंनी अतिशय सोज्वळ शब्दांत महाराष्ट्राला हसवलं, विचार करायला लावलं आणि समृद्ध केलं. त्यांच्या लेखणीतून प्रकट झालेला विनोद हा कधीही कोणाला दुखावणारा नव्हता, तर तो समाजातील विसंगतींवर, मानवी स्वभावाच्या गमतींवर बोट ठेवणारा होता. पुलंच्या विनोदाला एक सांस्कृतिक अधिष्ठान होतं, एक वैचारिक बैठक होती.

महाराष्ट्र हे राकट राज्य आहे, असं नेहमी म्हटलं जातं. पण याच राकट भूमीत अतिशय मृदू स्वभावाचे संत ज्ञानेश्वर येऊन गेले, ज्यांनी भागवत धर्माचा पाया रचला. ज्ञानदेवांचा काळ म्हणजे या राकट देशाने डोक्यावर घेतलेला व सावरलेला पदर. तो पदर म्हणजे ज्ञानोबांची अमृतानुभव, ज्ञानेश्वरी आणि अभंगवाणी. तो काळ म्हणजे महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक उन्नतीचा सुवर्णकाळ. त्यानंतर शिवकाळ आला, शिवकाळ म्हणजे तोच पदर कमरेत खोचून केलेली रणगर्जना, हलकल्लोळ, अट्टाहास! हे दोन्ही काळ महाराष्ट्राने पाहिलेय आणि महाराष्ट्राचा स्वभावही असाच घडलेला आहे. तुकोबा म्हणतात, 'मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ मेले जित असों निजोनियां जागे। जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥' ही महाराष्ट्राची खरी ओळख आहे. इथे मऊपणा आहे, संवेदनशीलता आहे; त्याचबरोबर अन्यायाविरुद्ध लढण्याची, वज्रालाही भेदण्याची ताकद आहे. हीच ताकद छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवली. याच ताकदीने अनेक संतांनी समाजात सुधारणा केली. तर, मूळ विषय असा की, आता काही दिवसांपूर्वी 'ऑपरेशन टायगर' या नावाने उबाठाचे खासदार फोडण्याच्या चर्चा रंगल्या होत्या. अर्थात ही त्यांच्या पक्षाची अंतर्गत बाब असल्याने कोणाला याच्याशी कर्तव्य नाही. पण या चर्चांमुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील सध्याची पातळी किती खालावली आहे, हे स्पष्ट होतं. खासदार फुटणार अशा चर्चा रंगू लागल्यावर संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेतली आणि त्यांनी पत्रकारांसमोर खासदारांना शिव्या घातल्या. ही घटना महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला काळिमा फासणारी आहे. संजय राऊत यांनी याआधीही पत्रकार परिषदांमध्ये शिव्या घातलेल्या आहेत, महिलेला उद्देशून अर्वाच्च भाषा वापरली आहे. ही त्यांची पहिली वेळ नाही, तर ही त्यांची सवय झाली आहे. सार्वजनिक जीवनात, विशेषतः पत्रकार परिषदेसारख्या व्यासपीठावर, जिथे हजारो लोक आपल्याला ऐकत असतात, टीव्हीवर बायका, लहान मुले तुम्हाला पाहत असतात तिथे अशी भाषा वापरणे हे अत्यंत निंदनीय आहे. ही केवळ असभ्यता नाही तर हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अपमान आहे. विशेष म्हणजे, मुंबईकरांच्या दुर्दैवाने झालेल्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी संजय राऊतांची बाजू उचलून धरली आणि आपल्या विचित्र शैलीत ही मराठी भाषा आहे असं म्हटलं. हा तर कहरच झाला ना भाऊ! शिवीगाळ करणे, अर्वाच्च भाषा वापरणे ही जर मराठी भाषा असेल, तर मग स्वातंत्र्यवीर सावरकरांनी व्यक्त केलेला सात्त्विक संताप काय होता? सावरकर त्या काळचे जहाल नेते. त्यांनी भोंदूंवर आणि देशशत्रूंवर साहित्याच्या माध्यमातून प्रचंड टीका केलीय. त्यांची टीका इतकी बोचरी की इंग्रज सरकारने त्यांच्या साहित्यावर बंदी घातली. पण सावरकरांनी आपला रोष व्यक्त करताना कुठेही शिव्या घातल्या नाहीत. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' हा त्या काळचा प्रचंड जहाल अग्रलेख टिळकांनी लिहिला. उद्धव ठाकरे, संजय राऊत, किशोरी पेडणेकर यांनी त्यांच्या समर्थकांनी कधी हे साहित्य वाचण्याचे कष्ट घ्यावे. मी म्हणजे मराठी, मी म्हणजे महाराष्ट्र, मी म्हणजे मराठी भाषा या फालतू अहंकारापोटी लोक तुम्हाला सोडून पळून जात आहेत. 'तुम्ही नको' असे केवळ महाराष्ट्राची जनता म्हणत नाही तर तुमचे नेतेही म्हणतायत. पण काही लबाड पत्रकार या लोकांची बाजू ठामपणे मांडतात. जणू यांचाच पक्ष फुटलाय. हे पत्रकारदेखील या मातीचे शत्रू आहेत. मराठी पत्रकारिता जणू मंडई झालेली आहे.

लक्षात ठेवा, मराठी भाषा ही समृद्ध आहे, तिला नवरसांची देणगी आहे. ती प्रेम व्यक्त करू शकते, शौर्य दाखवू शकते, विनोद निर्माण करू शकते आणि कठोर टीकाही करू शकते, पण ती कधीही शिवीगाळ करणारी भाषा नाही. कोणते शब्द चारचौघात वापरावेत आणि कोणते वैयक्तिक आयुष्यात याचं भान असायला हवं. मराठी भाषेला शिवीगाळ करणाऱ्यांच्या तोंडून 'मराठी भाषा' म्हणून समर्थन मिळणे हे मराठी भाषेचे दुर्दैव आहे. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना ना मराठीची जाणीव आहे, ना महाराष्ट्राची. त्यांना फक्त खुर्चीची जाणीव आहे, सत्तेची लालसा आहे. बरं ती खुर्ची कशी मिळवावी आणि कशी टिकवावी, याची जाणीव तर त्यांना नाहीच नाही. त्यांच्या कृतीतून आणि बोलण्यातून हेच वारंवार सिद्ध होत आहे. ज्या राज्यात पुलंसारखे साहित्यिक जन्माला आले, ज्या भूमीत ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी महाराज यांसारख्या महान व्यक्तींनी महाराष्ट्राला घडवलं, त्याच देशात आज ही शिवराळ भाषा मराठी राकट भाषेच्या नावाने खपवली जातेय, हे दुर्दैव आहे.

राकटपणा म्हणजे कठोरता, कणखरपणा, पण असभ्यता किंवा शिवीगाळ नव्हे. राकटपणा म्हणजे अन्यायाविरुद्ध लढण्याची धमक, स्वाभिमानाने जगण्याची वृत्ती. पण आजच्या राजकारण्यांनी राकटपणाचा अर्थ पूर्णपणे बदलून टाकला आहे. इथे पुलंचा एक किस्सा आठवतो. एका कार्यक्रमात वयोवृद्ध झालेले आचार्य अत्रे आणि पुलं दोघेही उपस्थित होते. रस्त्यावर सतत धूळ असल्याने अत्रेंनी राजकारण्यांवर टीका केली की किती धूळ. पुलं बोलायला उभे राहिले तेव्हा म्हणाले, 'ज्या माणसाने आयुष्यभर लोकांना धूळ चारली, त्याला का धुळीचा त्रास व्हावा!' हा मराठीचा गोडवा आहे लोकहो... आजच्या राजकारण्यांनी हा गोड चेहरा विद्रूप करण्याचा प्रयत्न चालवला आहे. खरं तर महाराष्ट्रात सध्या ऑपरेशन टायगर नव्हे तर 'ऑपरेशन शिव्या' सुरू आहे. मराठी भाषा ही शिवराळ राजकारण्यांची जहागीर नसून ज्ञानेश्वर-तुकोबा आणि पुलंच्या सुसंस्कृत वारशाचा पवित्र ठेवा आहे; हा ठेवा विद्रूप करणाऱ्यांना वेळीच आवरणे, हेच आजच्या पिढीपुढील खरे 'ऑपरेशन' आहे. ■

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

नीलेश जोशी

# 'मनी म्युल' फसवे मायाजाळ

'घरबसल्या काम करा आणि दरमहा ५० हजार रुपये कमवा', 'पार्ट टाईम काम करा आणि मिळवा हजारो रुपये' या आणि अशा स्वरूपाच्या जाहिरातीला बळी पडणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. झटपट पैसे कमविण्याची अभिलाषा, वाढती बेरोजगारी यासह इतर अनेक कारणे याला आहेत. या जाहिराती गावागावांत पत्रके वाटून, समाजमाध्यमांचा उपयोग करून केल्या जातात. जाहिराती असलेल्या संपर्कावर विचारणा केली असता कामाच्या स्वरूपाबाबत सांगितले जाते की, काही रक्कम त्यांच्या खात्यात जमा होईल आणि त्यांना ती पुढे दुसऱ्या खात्यात पाठवावी लागेल. या कामाच्या प्रत्येक व्यवहारावर कमिशन मिळेल. बेरोजगारीमुळे त्रस्त असलेला किंवा विविध अडचणीत फसलेला युवक हे काम स्वीकारतो. काही दिवसांत त्याच्या खात्यात लाखो रुपयांची उलाढाल होते. अचानक पोलिसांचा फोन येतो आणि त्याला कळते की, त्याच्या खात्यात आलेल्या आणि त्याने पुढे अन्य खात्यात वळत्या केलेल्या सर्व रकमा ऑनलाईन फसवणुकीतून आलेल्या होत्या. सायबर गुन्हेगार कोणत्याही व्यक्तीला थेट तुमचे खाते गुन्हेगारी व्यवहारासाठी वापरू द्या, असे सांगत नाहीत. त्याऐवजी आकर्षक ऑफर, नोकरीची संधी किंवा कमिशनच्या आमिषातून लोकांना जाळ्यात ओढले जाते. जाणता किंवा अजाणता या प्रकाराला बळी पडणाऱ्या व्यक्तींना 'मनी म्युल' असे संबोधले जाते.

आज इंटरनेट, मोबाईल बँकिंग, यूपीआय, ई-वॉलेट आणि ऑनलाईन व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे गुन्हेगारांनी सायबर फसवणुकीचे नवे मार्ग शोधले आहेत. अशाच धोकादायक आणि वेगाने वाढणाऱ्या गुन्हेगारी प्रकारांपैकी एक म्हणजे 'मनी म्युल घोटाळा.' अनेकांना या संज्ञेचा अर्थही माहिती नसतो, परंतु नकळतपणे हजारो नागरिक या गुन्हेगारी साखळीचा भाग बनत आहेत. सायबर गुन्हेगारांनी फसवणूक, ऑनलाईन लॉटरी, गुंतवणूक घोटाळे, बनावट नोकऱ्या, डिजिटल अटक, ओटीपी फसवणूक किंवा इतर मार्गांनी मिळविलेला पैसा थेट स्वतःच्या खात्यात न घेता तो दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात जमा करतात. त्यानंतर तो पैसा विविध खात्यांमधून फिरवून अखेरीस स्वतःपर्यंत पोहोचवतात. या प्रक्रियेत ज्यांच्या खात्यांचा वापर केला जातो, त्या व्यक्तींना 'मनी म्युल' म्हटले जाते. म्युल म्हणजे सामान वाहून नेणारे खेचर. जसे खेचर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सामान वाहून नेते, तसेच मनी म्युल बेकायदेशीर पैशाची वाहतूक करणारे माध्यम बनते. अनेकदा संबंधित व्यक्तीला आपण गुन्हेगारी कारवायांचा भाग बनलो आहोत, याची कल्पनाही नसते. मात्र, सहज पैसे कमविण्याच्या मोहापायी लोक यात अडकतात.

आज भारतासह जगभरातील कायदा अंमलबजावणी यंत्रणांसमोर मनी म्युल नेटवर्क मोठे आव्हान बनले आहे. ऑनलाईन फसवणुकीतून मिळालेला पैसा शोधणे कठीण व्हावे यासाठी गुन्हेगार अनेक बँक खाती, डिजिटल वॉलेट आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांचा वापर करतात. त्यामुळे तपास यंत्रणांना मूळ आरोपीपर्यंत पोहोचण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. इंडियन सायबर क्राईम को-ऑर्डिनेशन सेंटरने सप्टेंबर २०२४ मध्ये संशयास्पद खात्यांची नोंदणी सुरू केली तेव्हापासून सुमारे २५ लाख मनी म्युल खाती बँक आणि विविध वित्तीय संस्थांच्या निदर्शनास आणून दिली आहेत. या माध्यमातून जवळपास ८ हजार कोटी रुपयांची फसवणूक रोखल्या गेल्याचे एका अहवालात म्हटले आहे. खरं म्हणजे मनी म्युल हा केवळ आर्थिक गुन्हा नाही तर संपूर्ण सायबर गुन्हेगारीची साखळी आहे. जेव्हा एखादी व्यक्ती आपले खाते वापरू देते, तेव्हा ती नकळतपणे फसवणूक, आर्थिक गुन्हे आणि संघटित सायबर गुन्हेगारीला मदत करीत असते. त्यामुळे या समस्येकडे केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक जबाबदारी म्हणून पाहणे महत्त्वाचे आहे. शासन, बँका, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, पोलिस यंत्रणा आणि सायबर सुरक्षेचे ज्ञान असणारे नागरिक यांनी संयुक्तपणे जनजागृती केली तरच या वाढत्या धोक्याला आळा घालता येईल. आपले वैयक्तिक बँक खाते ही केवळ आर्थिक सुविधा नसून ती आपली कायदेशीर जबाबदारी आहे. याची जाणीव जागृती होणे देखील महत्त्वाचे म्हणावे लागेल. आज काही हजार रुपयांच्या मोहापायी आपले खाते दुसऱ्याला वापरू देणारी व्यक्ती उद्या मोठ्या गुन्हेगारी साखळीत अडकू शकते. त्यामुळे 'सहज पैसे कमवा' या आमिषाला बळी पडण्याऐवजी सजग नागरिक म्हणून आर्थिक व्यवहारांमध्ये सतर्कता बाळगणे हीच काळाची गरज आहे. ■

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# नेतृत्व दिवाळखोरी

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही वर्षांत अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. सत्तांतर झाले, पक्ष फुटले, चिन्हे बदलली, निष्ठा बदलल्या आणि अनेक राजकीय समीकरणे पूर्णपणे उलटली. मात्र, या सर्व घटनांमध्ये जर एखादा पक्ष सर्वाधिक हादरला असेल, तर तो म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना.

एकेकाळी महाराष्ट्राच्या राजकारणात अभेद्य वाटणारी शिवसेना आज अस्तित्व, नेतृत्व आणि संघटन या तिन्ही पातळ्यांवर संघर्ष करताना दिसते. या परिस्थितीसाठी विरोधक, भाजपा, शिंदे गट, निवडणूक आयोग किंवा केंद्रीय यंत्रणा जबाबदार आहेत, असा दावा सातत्याने केला जातो. पण प्रत्येक वेळी इतरांनाच दोष देत राहणे आणि स्वतःच्या नेतृत्वाचे मूल्यमापन टाळणे, हीच आजची ठाकरेंसाठी सर्वात मोठी समस्या बनली आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या काळातील शिवसेना आणि आजची शिवसेना यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक असल्याची चर्चा केवळ त्यांचे विरोधकच करीत नाहीत, तर अनेक जुने शिवसैनिकदेखील करतात. बाळासाहेबांच्या काळातही संकटे आली, पण पक्षाचे अस्तित्व कधीच धोक्यात आले नाही. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मात्र परिस्थिती वेगळी दिसली. निर्णयप्रक्रिया मर्यादित लोकांच्या हातात गेली, कार्यकर्त्यांशी संवाद कमी झाला व पक्षाची ऊर्जा रस्त्यावरील संघर्षातून पत्रकार परिषदांमध्ये अडकली.

२०१९ मध्ये भाजपासोबत निवडणूक लढवून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत सत्ता स्थापन करण्याचा निर्णय शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात मोठे राजकीय वळण होते. हा निर्णय योग्य की अयोग्य यावर मतभेद असू शकतात, पण त्या निर्णयामुळे पक्षाच्या पारंपरिक मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला, हे वास्तव नाकारता येत नाही. हिंदुत्वाच्या मुद्यावर मत मागायचे आणि नंतर विचारधारात्मक विरोधकांसोबत सत्ता वाटून घ्यायची, यामुळे शिवसेनेतील अनेक नेते आणि कार्यकर्ते अस्वस्थ झाले. त्या अस्वस्थतेचे रूपांतर पुढे बंडात झाले का, हा प्रश्न आजही चर्चेचा विषय आहे.

२०२२ मधील एकनाथ शिंदे यांचे बंड हे केवळ काही आमदारांचे राजकीय स्थलांतर नव्हते. तो नेतृत्वावरील अविश्वासाचा मोठा संदेश होता. दोन तृतीयांश आमदार एका वेळी पक्षातून बाहेर पडतात, ही घटना कोणत्याही राजकीय पक्षासाठी गंभीर धक्का असते. यावेळी उद्धव गटाने बंडखोरांना गद्दार, फितूर आणि विकाऊ अशी विशेषणे लावली. जनता त्यांना धडा शिकवेल, अशी भाषा केली. पण नंतर अनेक नव्हे तर जवळवजळ पूर्णच बंडखोर पुन्हा निवडून आले. जर जनता खरोखरच त्यांच्याविरोधात होती, तर त्यांना मतदारांनी पुन्हा निवडून दिले नसते. त्यांनी सिद्ध करून दाखवले ठाकरे 'ब्रॅण्ड' नाही तर आमच्यासारख्या कष्टाने शिवसेनेचा वटवृक्ष करणाऱ्यांमुळे ठाकरे हे 'ब्रॅण्ड' झाले आहेत; आणि अशा रक्ताचं पाणी करणाऱ्या खऱ्या खुऱ्या स्वाभिमानी, सच्चा कार्यकर्त्यांना शिवीगाळ करणे, गद्दार म्हणणे आणि नैतिकता, संस्कार, शिष्टाचाराचा प्रश्न येतो म्हणून त्या राऊतांनी दिलेल्या शिव्या इथे लिहिता येत नाही. अशी शिवीगाळ ऐकून नेते यांच्या सोबत राहतील अशी अपेक्षा करताना लाजसुद्धा वाटत नाही यांना.

संजय राऊत स्वतःला उद्धव गटाचा प्रमुख राजकीय योद्धा म्हणवून घेतात. रोज माध्यमांसमोर येऊन विरोधकांवर तोंडसुख घेतात. मात्र, त्यांच्या सकाळच्या प्रतापांमुळे पक्षाला फायदा झाला की नुकसान, हा विषय वेगळाच राहिला. सहा खासदार सोडून जाण्याच्या आदल्या दिवशी त्यांच्यावर तोंडसुख घेऊन राऊतांनी त्यांची वाट मोकळी करून दिली. राजकारणात रोज आरोप करणे आणि निवडणुका जिंकणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. टीव्ही स्टुडिओमधील आक्रमकता मतपेटीत यशात बदलतेच असे नाही. आज उबाठासमोरील सर्वात मोठा प्रश्न विरोधकांचा नाही, तर विश्वासाचा आहे. कार्यकर्त्यांचा विश्वास, स्थानिक नेत्यांचा विश्वास आणि मतदारांचा विश्वास पुन्हा मिळविणे ही सर्वात मोठी लढाई आहे. प्रत्येक फुटीसाठी बाह्य शक्तींना जबाबदार धरणे सोपे असते. पण जेव्हा मोठ्या प्रमाणावर लोक पक्ष सोडतात, तेव्हा नेतृत्वाने स्वतःकडेही पाहिले पाहिजे. प्रत्येक घटनेत भाजपाला ओढून आपले अपयश लपवून काहीही होणार नाही. यांचे असं झालं आहे, मुघल सैनिकांना जसे 'संताजी-धनाजी' स्वप्नात दिसायचे तसे उठता-बसता भाजपा मोदी-शाह दिसतात. पण असे लोकांकडे बोटं दाखवून चालत नाही. आत्मपरीक्षणाशिवाय पुनरुज्जीवन होत नाही, हे उठाबाने स्वीकारले पाहिजे. अन्यथा यांची अधोगती कोहीही रोखू शकणार नाही.

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली, काँग्रेस अनेक राज्यांत कमकुवत झाली, शिवसेना विभागली गेली या सर्व घटनांमधून एक समान धडा मिळतो. कोणताही पक्ष केवळ भावनिक निष्ठेवर टिकत नाही. कार्यकर्त्यांना संधी, नेत्यांना स्थान आणि संघटनेला दिशा मिळाली पाहिजे. आज उद्धव ठाकरे यांच्या राजकारणासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे सहानुभूतीचे मत नेतृत्वाच्या विश्वासात रूपांतरित करणे. कारण सहानुभूती तात्पुरती असते, पण नेतृत्वावरील विश्वास दीर्घकालीन असतो.

निवडणूक आयोग, न्यायालये आणि इतर घटनात्मक संस्थांवर टीका करण्याची भूमिका देखील अनेकदा विरोधाभासी वाटते. निर्णय अनुकूल असेल तेव्हा संस्थांचे स्वागत करायचे आणि प्रतिकूल असेल तेव्हा त्यांच्यावर प्रश्न उपस्थित करायचे. जुन्या पक्षफुटीच्या प्रकरणाचा निकाल न्यायालय देत नाही म्हणून न्यायालयावर आगपाखड करायला न थकणारी हीच मंडळी आता पुन्हा खासदारांच्या फुटीनंतर त्याच अविश्वास असलेल्या न्यायालयासमोर जाण्याची भाषा करत आहेत. निवडणूक आयोगावर विश्वास नाही, ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात, तरी देखील निवडणूक आली की ती लढवायला सगळ्यात पहिले हेच लोकं तयार असतात. हा सगळा विरोधाभासी आणि संधिसाधू राजकारणाचा चेहरा आता जनतेसमोर आला आहे. महाराष्ट्रातील मतदार आता पूर्वीपेक्षा अधिक जागरूक आहेत. ते केवळ घोषणांवर विश्वास ठेवत नाहीत. ते निकाल पाहतात, नेतृत्व पाहतात, सातत्य पाहतात आणि इतिहास लक्षात ठेवतात.

आज प्रश्न केवळ पक्षफुटीचा नाही; प्रश्न आहे नेतृत्वाच्या परिणामकारकतेचा. पक्षातून सतत लोक का जातात? कार्यकर्ते का नाराज होतात? मतदार का संभ्रमित होतात? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधल्याशिवाय उबाठाला गत्यंतर नाही. बाळासाहेब ठाकरे यांनी उभी केलेली शिवसेना संघर्ष, संघटन आणि रस्त्यावरच्या राजकारणातून घडली होती. आज तीच शिवसेना अस्तित्वासाठी झगडताना दिसत असेल, तर त्यामागील कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. इतिहासाचा एक नियम असतो. विरोधकांवर विजय मिळविण्यापूर्वी स्वतःच्या कमतरतांवर विजय मिळवावा लागतो. जे नेतृत्व हा धडा विसरते, त्याला जनता वेळोवेळी वास्तवाची जाणीव करून देते आणि म्हणूनच आज महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वात मोठा प्रश्न शिवसेना विरोधकांमुळे कमकुवत झाली की नेतृत्वातील त्रुटींमुळे? याचे उत्तर शोधल्याशिवाय राजकारणात टिकून राहण्याचा ठाकरेंकडे दुसरा मार्ग नाही. ■

९२७०३३३८८६

### तलावातील पाणी पिण्याच्या पाण्यासाठीच वापरा

नागपूर व विदर्भातील उन्हाळा सर्वपरिचित आहे. उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून वाढते तापमान ही केवळ नैसर्गिक समस्या नसून नियोजन व पर्यावरणावरील दुर्लक्षाचे दुष्परिणाम आहेत. मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड आणि जलस्तोत्रावरील अतक्रिमण यामुळे उष्णतेची तीव्रता अधिक वाढत आहे. सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची कमतरता, रस्त्यावरील सावलीसाठी झाडांचा अभाव आणि उष्माघाताविषयी मर्यादित जनजागृती ही गंभीर समस्या बनली आहे. जशी जशी उन्हाची तीव्रता वाढते, तसे तसे पाण्याच्या बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढत जाते व त्यामुळे आपल्याला पाण्याची कमतरता भासत असते. मग जलस्रोत वाढवणे, पाण्याचा वापर काटकसरीने करणे, पर्यावरणपूरक वातावरण इत्यादी बाबींकडे आपले लक्ष जात असते. भंडारा जिल्ह्यात गावांपेक्षा तलावांची संख्या जास्त आहे. या धर्तीवर विदर्भातील सर्व प्रमुख गावांचा विचार होऊन जुने मालगुजारी तलाव, लघु पाटबंधारे प्रकल्प, मध्यम प्रकल्प यांची संख्या वाढविण्याचा विचार व्हायला पाहिजे. तलावांमुळे पिण्याच्या पाण्याची सोय व शेतीसाठी सिंचनाची सोय होत असते. तसेच जमिनीतील पाण्याची पातळी वाढत असते. सिंचन तलावांची संख्या वाढविणे गरजेचे आहे; जेणेकरून पाणी टंचाई कमी होईल.

**शशिकांत दलाल**/नागपूर
९८२२३६५१९०.

■■■

### सर्व रस्त्यांना समान न्याय हवा

'मुंबई-पुणे ४८ मिनिटांत शक्य' ही बातमी वाचली. बुलेट ट्रेनमुळे ते शक्य होणार यचा आनंदही झाला, पण गेली अनेक वर्षे मुंबई-पुणे अंतर कमीत कमी वेळात पार पाडण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न होताना दिसतात, त्याचा खरंच फायदा होतोय? मुंबई-नाशिक, मुंबई-वापी, अहमदाबाद, मुंबई -गोवा य शहरांमध्ये कमी वेळात प्रवेश व्हावा यासाठी किती प्रयत्न केले जाताहेत? आता गौरी-गणपतीचे दिवस येतील आणि कोकणात जाणाऱ्या रस्त्यांवर घनघोर चर्चा होईल, पण प्रत्यक्षात गेल्या दोन दशकांत हा रस्ता कधीच सुधारला नाही हे कटू वास्तव आहे. मुंबई-अहमदाबाद मार्ग तर सवयीचं मूल असल्यासारखा वाढवला जातो. इतके अपघात होतात तरीही त्यावर काहीही तोडगा काढला जात नाही, रस्ता दुरुस्त होत नाही. तीच गत मुंबई-नाशिक रस्त्यांची आहे. आता कुंभ आला आहे म्हणून थोडीफार डागडुजी होईलही पण कायमस्वरूपी रस्त्याचे स्वरूप बदलणार नाही हे नक्की. एकूणच देशात काही ठरावीक शहरांमधील रस्ते बदलतात, पण इतरत्र मात्र सरकारी अनास्था प्रामुख्याने दिसून येते. संपूर्ण देशातील सर्व रस्त्यांना समान न्याय मिळाला तर भारताचे चित्र अजून परिणामकारक होईल असे वाटते.

**माया हेमंत भाटकर**/पुणे

■■■

## वाचक पत्रे

### 'झुरळां'वर उपाययोजना आवश्यक

नीट पेपरफुटीचा पर्दाफाश करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण विभागाचे पथक काम करत असून पेपरफुटीच्या मुख्य सूत्रधारांवर कठोर गुन्हे दाखल केले जात आहेत. जे शिक्षक आणि परीक्षा माफिया प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते छपाई आणि वितरणात गैरप्रकार करताना आढळले आहेत, त्यांना अटक करून तुरुंगात पाठवले जात आहे.

२१ जूनला होणारी नीट परीक्षा सुरळीत पार पडावी म्हणून प्रथमच हवाई दलाच्या मदतीने प्रश्नपत्रिका सुरक्षितपणे केंद्रांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रश्नपत्रिका केंद्रांवर पोहोचवताना त्यांना सीआयएसएफ आणि सीआरपीएफ जवानांची सुरक्षा पुरवण्यात येणार आहे. सरकारने जर पुन्हा पेपरफूट होऊ नये म्हणून फारसे प्रयत्न केले नसते किंवा पेपरफुटीतील गुन्हेगारांना पाठीशी घातले असते तर झुरळ पार्टीचे आंदोलन योग्य ठरले असते. आपल्या आंदोलनाचे समर्थन करताना दिपके म्हणाले, जनआंदोलनानेच स्वातंत्र्य मिळाले. परंतु असे म्हणताना ते हे विसरले की, पारतंत्र्यातील जनआंदोलन हे अत्याचारी इंग्रज सरकारविरुद्ध होते, त्यामुळे ते जनआंदोलन फार आवश्यक होते. परंतु आजची परिस्थिती वेगळी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताच्या वाढलेल्या दबदब्याने काही जणांना पोटशूळ उठला आहे. त्यामुळे लोकनियुक्त सरकार अस्थिर करणे, देशातील तरुणांना भडकविणे यासाठी पेपरफुटीचे निमित्त करून देशद्रोही कार्यभाग साधण्यासाठीच या झुरळ आंदोलनाचे प्रयोजन आहे. म्हणूनच अशा झुरळांवर उपाययोजना करावी, असे वाटते. ■



**कल्पना विनय माहूरकर**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# दशक्रिया विधीसाठी गेलेल्या तरुणाचा गोदावरी नदीत बुडून मृत्यू

## परभणी जिल्ह्यातील रामपुरी येथील घटना



**परळी वैजनाथ :** परळी तालुक्यातील हिवरा (गो) येथील रहिवासी सुरेश रासवे (वय 50) यांचा परभणी जिल्ह्यातील रामपुरी येथे गोदावरी नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. नातेवाईकाच्या दशक्रिया विधीसाठी गेले असताना ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरेश रासवे हे नातेवाईकांच्या दशक्रिया कार्यक्रमासाठी रामपुरी (ता. मानवत) येथे गेले होते. दरम्यान, गोदावरी नदीत पोहत असताना ते अचानक बेपत्ता झाले. घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तत्काळ शोधमोहीम सुरू केली.

याबाबतची माहिती मिळाल्यानंतर मानवतचे तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांनी नगरपरिषद कर्मचारी, पोलीस प्रशासन, तलाठी, एनडीआरएफ पथक तसेच स्थानिक नागरिकांच्या मदतीने व्यापक शोधमोहीम राबविली. जवळपास 30 ते 40 फूट खोल पाण्यात शोधकार्य करण्यात आले.

सुमारे तीन ते चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर दुपारी 3 ते 3.15 वाजण्याच्या सुमारास सुरेश रासवे यांचा मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्राकडे पाठविण्यात आला. या दुर्दैवी घटनेमुळे हिवरा (गो) गावासह परिसरात शोककळा पसरली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## शॉर्टसर्किटने पत्रकार प्रशांत मस्के यांचे घर व कपड्यांचे दुकान जळून खाक; ₹1.61 लाखांचे नुकसान



**अंबाजोगाई :** विद्युत शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत पत्रकार प्रशांत रघुनाथ मस्के यांचे घर व कपड्यांचे दुकान जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या आगीत घरातील फर्निचर, टीव्ही, कुलर, वॉशिंग मशीन तसेच दुकानातील साड्या व इतर कपड्यांसह मोठ्या प्रमाणात साहित्य जळून नष्ट झाले.

प्राथमिक माहितीनुसार, विजेच्या शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली असून या दुर्घटनेत अंदाजे 1 लाख 61 हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. आगीमुळे घरगुती साहित्य आणि व्यावसायिक माल दोन्हीचे मोठे नुकसान झाल्याने मस्के कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस पाटील सरपंच, तलाठी व मंडळ अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच नुकसानीचा पंचनामा करून संबंधित अहवाल प्रशासनाकडे सादर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## बीड - माजलगावात तीन कृषी केंद्राचे परवाने तात्पुरते रद्द

बनावट खत विक्रीप्रकरणी माजलगाव तालुक्यातील तीन कृषी सेवा केंद्रावर कृषी विभागाने कठोर कारवाई करत खत विक्री परवाना - तात्पुरता निलंबित केले असुन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी याबाबत आदेश जारी केला.संबंधित कृषी सेवा केंद्राविरोधात पुढील चौकशी सुरू करण्यात आली आहे.

कृषी विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी व तपासणी अहवालानुसार माजलगाव तालुक्यातील जुना मोंढा परिसरातील गणेश कृषी सेवा केंद्र, नमन अँग्रो एजन्सी, श्री दत्त कृषी सेवा केंद्र या दुकानांची तपासणी करण्यात आली होती. या तपासणीत संबंधित विक्रेत्याने खत (नियंत्रण) आदेश मधील

तरतुदींचे उल्लंघन करून परवान्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आले. तपासणीदरम्यान कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुकानातील खत विक्री व साठ्याची पडताळणी केली. त्यानंतर संबंधित विक्रेत्याला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी ही कारवाई केली. आदेशानुसार संबंधित कृषी सेवा केंद्राचा खत विक्री परवाना २ ऑगस्ट पर्यंत निलंबित करण्यात आला आहे. या कालावधीत कोणत्याही प्रकारची खत विक्री करता येणार नाही.

## ऊसतोड मजुरांच्या उचल रकमेतून वाद; युवकाचे अपहरण, तिघे आरोपी ताब्यात

### परळी शहर पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा

**परळी वैजनाथ :** ऊस तोडीच्या उचल रकमेतून झालेल्या वादातून एका युवकाचे अपहरण करून त्याला मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. 19) सकाळी 9 वाजण्याच्या सुमारास परळी वैजनाथ येथील मौढा परिसरातील अरुणोदय मार्केट येथे ही घटना घडली. पीडित विनोद नवनाथ वैरागे (रा. स्वाभिमाननगर, परळी वैजनाथ) यास उसतोडीसाठी घेतलेल्या उचल रकमेसंदर्भात आरोपींनी जाब विचारला. त्यानंतर संगनमत करून विनोद वैरागे यास मारहाण करण्यात आली तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. त्यानंतर त्याचे बळजबरीने अपहरण करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी राजू प्रल्हाद कांबळे (रा. सोरजा, ता. जिंतूर, जि. परभणी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 160/2026 दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्यात आप्पाराव उर्फ माऊली उजगरे, सविन आप्पाराव उजगरे, विश्वजित ज्ञानेश्वर कदम, गिरीधर शत्रुघ्न पुरी, दीपक चव्हाण आणि सचिन संतोष कदम यांच्याविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनेत वापरण्यात आलेली एमएच-46 एयू-5981 क्रमांकाची चारचाकी गाडी जप्त केली असून तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. मात्र अद्याप कोणताही मुद्देमाल हस्तगत झालेला नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिंगणे हे करत आहेत. परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नाचण यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाचा आढावा घेतला आहे.

## माजलगावच्या नगरसेविका रेखा आंबुरे यांचे कुणबी प्रमाणपत्र अवैध ठरले

### नगरसेवकपद धोक्यात आल्याने माजलगावमध्ये खळबळ



बीड, दि.१९ (प्रतिनिधी)- गतवर्षी पार पडलेल्या माजलगाव नगर पालिका निवडणुकीमध्ये ओबीसीसाठी आरक्षीत जागेवर मराठा कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे निवडणुक लढवून विजयी झालेल्या रेखा आंबुरे यांच्या कुणबी प्रमाणपत्रावर पराभूत उमेदवार सुमनबाई मुंडे यांनी आक्षेप घेतला होता. या प्रकरणी सुनावणी होवून जिल्हा समितीकडून कुणबी जात प्रमाणपत्र अवैध असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर हे प्रमाणपत्र जप्त करण्याचे आदेश दिल्याने रेखा आंबुरे यांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे.

माजलगाव तालुक्यातील खळवट लिंबगाव येथील मुळ रहिवासी रेखा अंकुशराव आंबुरे, सासरचे नाव रेखा प्रल्हादराव सरवदे यांनी इतर मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध करत इतर मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या वार्डातून माजलगाव नगर पालिका निवडणुक लढवली. या निवडणुकीत त्यांचा विजय झाला. त्यांच्या विरोधात उभ्या असलेल्या सुमनबाई मुंडे यांनी रेखा आंबुरे यांच्या असलेले कुणबी प्रमाणपत्र अवैध असल्याची तक्रार यांनी जात पडताळणी समितीकडे केली होती. या अर्जावर आणि पुराव्यावर सखोल सुनावणी झाली. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेल्या निर्णयानुसार रेखा अंकुशराव आंबुरे यांच्या कुणबी जातीचा दावा नियमानुसार अमान्य करण्यात आला आहे. त्यांचे कुणबी प्रमाणपत्र जप्त करण्याचे आदेश पारित करण्यात आले. सदर निर्णय जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष शरद कुलकर्णी, सदस्य उमेश सोनवणे, सदस्य सचिव श्रावस्ती मिश्राम यांच्या त्रिसदस्यीय समितीने एकमताने कुणबी प्रमाणपत्र अवैध असल्याचा निर्णय दिला. पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि माजलगावचे मुख्याधिकारी यांना अधिकृत प्रत पाठवून दिली. तक्रारदाराच्या वतीने ॲड.विकास मिसाळ यांनी काम पाहिले तर त्यांना ॲड.दीपक कुलकर्णी, ॲड.उदय दराडे यांनी सहकार्य केले. रेखा आंबुरे यांचे कुणबी प्रमाणपत्र अवैध असल्यामुळे त्यांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे.

## माणसाने नको ती व्यसने करण्यापेक्षा भजनाचे व्यसन लावावे-अक्षय महाराज पिंगळे

**बीड | दिनांक २०(प्रतिनिधी) :** माणसाने नको ती व्यसने करण्यापेक्षा भजनाचे व्यसन करावे. एकदा का भजनाचे व्यसन माणसाला लागले की, त्या माणसाचा परमार्थ सुखाचा होतो. भगवंत भक्तीतूनच जीवनाचा उद्धार होतो, हा विचार सर्व संतांनी आपल्या अभंगांतून समाजासमोर मांडला आहे. परंतु, माणूस भौतिक साधनांमध्ये सुख शोधण्याचा प्रयत्न करतो आणि खऱ्या सुखापासून अलिप्त राहतो. म्हणूनच आजच्या समाजाला संत विचारांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन ख्यातनाम कीर्तनकार अक्षय महाराज पिंगळे यांनी केले.

येथील स्व. झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने आषाढी वारीनिमित्त यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात शुक्रवारी (दि. १९) कीर्तनकार अक्षय महाराज पिंगळे यांचे सुश्राव्य सांप्रदायिक कीर्तन संपन्न झाले. कीर्तनाच्या प्रारंभी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खटोड यांनी पिंगळे महाराजांचा यथोचित सत्कार केला.

या कीर्तन सेवेसाठी अक्षय महाराज पिंगळे यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या 'जाय जाय तूं पंढरी। होय होय वारकरी॥ सांडोनिया वाळवंट। काय इच्छिसी वैकुंठ॥ या अभंगावर रसाळ निरूपण केले. ते म्हणाले की, ज्यांना साधू-संतांचे विचार समजू शकले नाहीत, त्यांना परमार्थ कधीच समजणार नाही. माणसाने वेळेत वेळ काढून परमार्थ केला पाहिजे. संतांचे विचार जीवन कशासाठी जगायचे, याची खरी प्रेरणा देतात. त्यामुळे प्रत्येकाने साधू-संतांचा आदर-सन्मान केला पाहिजे.

पुढे बोलताना महाराज म्हणाले की, प्रत्येकाने जीवनात कधीतरी तुकाराम गाथा आणि ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाचन केले पाहिजे. पूर्ण ज्ञानेश्वरी वाचणे शक्य झाले नाही, तरी त्यातील किमान एक ओवी वाचून ती आत्मसात करावी. एका ओळीचे जरी अनुकरण करता आले, तरी माणसाला जीवनाचे खरे मर्म समजू शकेल. भजनाची सवय एकदा लागली की ती सुटत नाही, म्हणूनच जीवनात चांगल्या सवयी जाणीवपूर्वक लावून घ्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले.या कीर्तन सोहळ्याला बालटाळकरी, वारकरी तसेच गायक-वादकांनी सुरेल साथसंगत केली. यावेळी बीड शहर व परिसरातील विठ्ठलभक्त आणि श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडवणीत एल्गार, दुधाचा भाव आम्हीच ठरवणार, 80 रूपये प्रतिलिटर दर

**वडवणी :** दूधाचा भाव ठरविण्याचा अधिकार आजपर्यंत सरकार, दूध संघ किंवा खासगी डेअऱ्यांकडेच असल्याचे चित्र होते. मात्र, बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांनी ही परंपरा मोडीत काढत स्वतःच्या दुधाचा भाव स्वतःच ठरविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील दूध व्यवसायाच्या इतिहासात वडवणीने एक नवा अध्याय लिहिला आहे.

रेणुका माता मंगल कार्यालय, वडवणी येथे झालेल्या भव्य बैठकीत तालुक्यातील २० हून अधिक गावांतील ३०० पेक्षा जास्त दूध उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते. बैठकीत एकमताने ठराव मंजूर करत दुधाचा किमान दर ८० रुपये प्रतिलिटर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांनी स्पष्टपणे सांगितले की, आता सरकारकडे भाव मागायचा नाही, तर आपल्याच मालाचा योग्य दर आपणच ठरवायचा. या निर्णयामुळे वडवणी तालुक्यात नव्या

महाराष्ट्रात प्रथमच शेतकऱ्यांनी स्वतःच दुधाचा दर निश्चित केला

दूध चळवळीची सुरुवात झाल्याचे मानले जात आहे. भेसळविरोधी कारवाईने वाढवला आत्मविश्वास राज्याचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दूध व दूधजन्य पदार्थांमधील भेसळविरोधात कठोर कारवाई केल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. भेसळयुक्त दूध, बनावट खवा आणि पनीर उत्पादकांवर झालेल्या कारवाईमुळे बाजारात शुद्ध दुधाला योग्य किंमत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शेतकऱ्यांनी बैठकीत सांगितले की, भेसळीमुळे खऱ्या दुधाला योग्य दर मिळत नव्हता. आता शुद्ध दूध उत्पादकांना न्याय मिळण्याची वेळ आली आहे. पशुखाद्य, चारा, औषधे, मजुरी आणि इतर खर्चात मोठी वाढ झाल्याने दूध उत्पादनाचा खर्च प्रचंड वाढला आहे. ३० ते ३५ रुपये प्रतिलिटर दराने दूध विकून खर्च भागवणे अशक्य

होत असल्याने अनेक शेतकरी दुग्ध व्यवसायापासून दूर जात होते. याच पार्श्वभूमीवर, शेतकरी जगवायचा असेल तर दुधाला किमान ८० रुपये भाव मिळालाच पाहिजे, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. बैठकीत ठरल्याप्रमाणे तालुक्यातील कोणत्याही डेअरीला किंवा दूध संकलन केंद्राला ८० रुपयांपेक्षा कमी दराने दूध खरेदी करता येणार नाही. तसेच सर्व दूध संकलन केंद्रांवर दुधाला ८० रुपये प्रतिलिटर भाव असे फलक लावण्याचेही ठरविण्यात आले आहे. शहर व ग्रामीण भागात घरपोच दूध विक्रीही ८० रुपये प्रतिलिटर दराने सुरू झाली असून ग्राहकांकडूनही या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. वडवणी तालुक्यातील हा निर्णय केवळ दरवाढीपुरता मर्यादित नसून, तो शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाचा आणि आर्थिक स्वावलंबनाचा नवा अध्याय मानला जात आहे. स्वतःच्या उत्पादनाचा भाव स्वतः ठरविण्याचा हा प्रयोग यशस्वी ठरल्यास, तो संपूर्ण महाराष्ट्रातील दूध उत्पादकांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो.

## राज्यातील जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाचा सहा महिन्यांत अहवाल सादर करा

### पंकजा मुंडे यांनी मंत्रालयात घेतला विभागाचा आढावा

**मुंबई :** राज्यातील विविध रुग्णालयांतून निर्माण होणाऱ्या जैववैद्यकीय कचऱ्याचे प्रमाण, त्यावरील प्रक्रिया, वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांची क्षमता, प्रत्यक्ष कामकाज आणि संबंधित भागातील गरज यांचा सखोल अभ्यास करून सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांच्या कामकाजावर नियमित नियंत्रण ठेवण्याबरोबरच विद्यमान धोरणात आवश्यक बदल करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांबाबतची सद्यस्थिती व अधिकार क्षेत्राच्या पुनर्रचनेसंदर्भात मुंडे यांनी आज मंत्रालयीन दालनात बैठक घेतली. यावेळी विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, उपसचिव जॉय ठाकूर आदी उपस्थित होते. राज्यातील वैद्यकीय कचरा (बायो-मेडिकल वेस्ट) व्यवस्थापनाची सध्याची स्थिती, उपचार केंद्रांची क्षमता, परवानगी प्रक्रिया आणि देखरेख याबाबत यावेळी आढावा घेण्यात आला. केंद्र शासनाच्या नियमानुसार जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया केंद्रांना परवाने देताना रुग्णालयांना पर्याय उपलब्ध व्हावेत, स्पर्धात्मक व्यवस्था निर्माण व्हावी आणि सेवा अधिक कार्यक्षम व्हावी. एखाद्या संस्थेवर संपूर्ण अवलंबून राहण्याऐवजी विविध भागांमध्ये पुरेशी प्रक्रिया केंद्रे उपलब्ध असावीत, असे मत मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केले.

## विवाहित महिलेचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार; 5 जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**गेवराई :** एका विवाहित महिलेचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करण्यात आल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.या पाशवी कृत्यानंतर पीडितेला रात्रभर डांबून ठेवत बेदम मारहाणही करण्यात आली. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून संपूर्ण जिल्ह्यात या घटनेमुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे.

समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, पीडित विवाहित महिला गेवराई तालुक्यातील एका गावात आपल्या शेतात नेहमीप्रमाणे काम करत होती. ती शेतात एकटी असल्याचे पाहून दबा धरून बसलेल्या दोघांनी तिच्यावर हल्ला केला. प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी तिला जबरदस्तीने उचलून नेले आणि तिचे अपहरण केले. अपहरण केल्यानंतर दोघांनी विवाहितेवर बळजबरीने अत्याचार केला. इतकेच नव्हे तर या गुन्ह्यात सामील असलेल्या इतर तीन जणांनी पीडितेला लाथाबुक्क्यांनी आणि काठ्यांनी बेदम मारहाण केली. आरोपींनी सर्व मर्यादा ओलांडत पीडितेला रात्रभर एका अज्ञात ठिकाणी डांबून ठेवले. रात्रभर तिचा शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात आला. त्यानंतर पहाटेच्या सुमारास गावाजवळील एका निर्जन शेतात तिचे हात-पाय बांधून तिला तिथेच टाकून आरोपी घटनास्थळावरून फरार झाले.

महिला सायंकाळ झाली तरी घरी न परतल्यामुळे तिचे कुटुंबीय चिंतेत पडले होते. त्यांनी रात्रीपासूनच गावात आणि शेजारील परिसरात तिचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. मात्र, रात्रभर तिचा कुठेही पत्ता लागला नाही. गावाजवळील एका शेतात ही विवाहिता हातपाय बांधलेल्या आणि गंभीर जखमी अवस्थेत आढळून आली. तिला या अवस्थेत पाहून कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. तिची तात्काळ सुटका करण्यात आली.

पीडितेची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने आणि तिच्या शरीरावर मारहाणीच्या खुणा असल्याने कुटुंबीयांनी तिला तातडीने बीड येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले. सध्या तिच्यावर रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असून, तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे. या घटनेची माहिती मिळताच गेवराई पोलिसांनी तातडीने जिल्हा रुग्णालय गाठून पीडित महिलेचा जबाब नोंदवून घेतला. पीडितेच्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात पाच संशयित आरोपींविरुद्ध अपहरण, अत्याचार आणि बेदम मारहाण या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली असून, लवकरच सर्व आरोपींना बेड्या ठोकल्या जातील, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे

## राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांना पुण्यतिथी निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अभिवादन



**बीड (प्रतिनिधी):** येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री हिंदवी स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ मासाहेब यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस.धुतालमल, या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी राजमाता जिजाऊ मासाहेब आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली याप्रसंगी या विद्यालयाचे शिक्षक संतोष मेश्राम पवळ यु.बी.आणि आर बी घुले. राजमाता जिजाऊ यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आपल्या विचार प्रतिपादनातून प्रकट केले.

यांप्रसंगी मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी राजमाता जिजाऊ यांनी असामान्य परिस्थितीमध्ये प्रतिकूल परिस्थितीमध्ये स्वाभिमानी आणि पराक्रमी वृत्तीचे कर्तृत्व दाखवून छत्रपती शिवाजी महाराजांच्या माध्यमातून रयतेचे राज्य निर्माण केले असे उद्गार स्पष्ट करून मार्गदर्शन केले यांप्रसंगी कार्यक्रमाचे संचालन पवळ यु बी. प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार डब्ल्यू एस. वाघमारे यांनी मानले यांप्रसंगी या विद्यालयाचे शिक्षक आर .बी घुले आणि श्रीमती यांची मुंडे आनंदक्षेत्रालयाचे अधीक्षक डी. व्ही. खरसाडे शिक्षकेतर कर्मचारी एलबी हजारे सुभाष गायकवाड बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## बीडला यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात तीन दिवसीय 'यक्षप्रश्न' संगीतमय कथा

### ह.भ.प.प्रसाद महाराज काष्टे करणार निरूपण

**बीड :** आषाढी वारीचे औचित्य साधून शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये दि. २० जून ते २३ जून या तीन दिवसांच्या कालावधीत हा भक्तिमय सोहळा आहे. यात कथाकार ह.भ.प. प्रसाद महाराज काष्टे यांच्या ओघवत्या वाणीतून 'यक्षप्रश्न' या अत्यंत उद्बोधक विषयावर संगीतमय कथा गुंफली आहे.

महाभारत कालीन यक्षाने धर्मराजाला विचारलेले प्रश्न आणि धर्मराजाने दिलेली उत्तरे, म्हणजेच 'यक्षप्रश्न' हा विषय मानवी जीवनाला दिशा देणारा आहे. या गंभीर आणि तितक्याच रंजक विषयावर ह.भ.प. प्रसाद महाराज काष्टे हे आपल्या रसाळ आणि ओघवत्या निरूपणातून प्रकाश टाकणार आहेत.

भाविक आणि श्रोत्यांची सोय लक्षात घेऊन या ३ दिवसीय संगीतमय कथेचे दररोज तीन वेगवेगळ्या सत्रांमध्ये नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये पहिले सत्र दररोज सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत, दुसरे सत्र दुपारी ३ ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत आणि तिसरे सत्र सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत असणार आहे. दररोज या तीनही सत्रांच्या माध्यमातून ज्ञानाची आणि भक्तीची गंगा यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात अविरतपणे वाहणार आहे.

## लोकनेते सोळंके साखर कारखान्याच्या बगॅजच्या आगीत जखमी कर्मचाऱ्यास कारखान्याकडून 5 लाखाची आर्थिक मदत

तेलगाव, दि.(प्रतिनिधी)= तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या बगॅजला गेल्या दीड महिन्यापुर्वी लागलेल्या आगीत कासारी येथील बालासाहेब चोपडे नावाचा कर्मचारी भाजुन जखमी झाला होता.सदर जखमी कर्मचाऱ्याबद्दल कारखाना प्रशासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यास कारखान्याचे जेष्ठ संचालक आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते ५लाख रू.ची आर्थिक मदत देत माणुसकीचा धर्म निभावला. कारखान्याच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे.



यासंदर्भात माहिती अशी की,तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या बगॅजला दि.२९\०४\२०२६ रोजी अचानक लाग लागली होती. या आगीत कासारी ता.धारूर येथील बालासाहेब बारीकराव चोपडे आग विझवताना त्यांना दुखापत होऊन ते जखमी झाले होते.त्यांना उपचारार्थ आर्थिक मदतीची गरज असल्याची अवश्यकता कारखाना प्रशासनाने ओळखून,ही बाब कारखान्याचे जेष्ठ संचालक आ.प्रकाश दादा सोळंके यांना सांगीतली. त्यावर आ.प्रकाश दादा सोळंके यांनी चोपडे यांच्याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना कारखान्याकडून ५लाख रू.आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेत. सदर आर्थिक मदत तात्काळ देण्याचा निर्णय घेऊन, शुक्रवार दि.१९ जुन रोजी आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते ५ लाख रू.चा धनादेश चोपडे यांच्या पत्नी व परिवारास देण्यात आला. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर, ऊसतोड संघटनेचे कृष्णा तिडके व इतर उपस्थित होते. सोळंके कारखान्याने आगीत जखमी झालेल्या कर्मचाऱ्या बद्दल घेतलेला निर्णय स्तुत्य व प्रशंसनीय असल्याच्या प्रतिक्रिया सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पोलिओ डोसपासून एकही बालक वंचीत राहू नये– जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

## जिल्हास्तरीय टास्क फार्स समितीच्या बैठकीत सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**
जिल्ह्यात २८ जून २०२६ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असून शून्य ते पाच वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.
जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम २०२६ च्या अनुषंगाने जिल्हास्तरीय टास्क फोर्स समितीची बैठक जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.
या बैठकीस शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. राहुल गीते, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र पुरी, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिपक मोरे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेश्वर कत्रूवार, डॉ. सुनील देशमुख, बालरोगतज्ज्ञ डॉ. गोपाल कदम, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन राठोड, डॉ. गंगाधर काळे, डॉ. नरवाडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन चव्हाण, डॉ. गणेश जोगदंड, डॉ. संदीप काळे, डॉ. डी. व्ही. सावंत, डॉ. नारायण शिंदे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक शंकर तावडे, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्रीपाद गारुडी, जिल्हा साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश जाधव तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.
जिल्ह्यात शून्य ते पाच वर्षे वयोगटातील एकूण १ लाख २३ हजार ९५६ बालकांना पोलिओचा डोस देण्याचे उद्दिष्ट असून यासाठी १ हजार २०२ बुथ उभारण्यात येणार आहेत. बसस्थानके, रेल्वे स्थानके, चेकपोस्ट आणि साखर कारखान्यांवर ट्रांझिट टीममार्फत, तर वीटभट्ट्या व पालांवर मोबाईल टीममार्फत बालकांना पोलिओ डोस देण्यात येणार आहे. मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर पर्यवेक्षण अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
पालकांनी आपल्या शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना दि. २८ जून रोजी जवळच्या पोलिओ बुथवर घेऊन जाऊन पोलिओचा डोस पाजावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. तसेच आरोग्य, महिला व बालविकास आणि शिक्षण विभागांनी समन्वयाने काम करून मोहिमेची व्यापक जनजागृती करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. या बैठकीच्या आयोजनासाठी मनिषा वडकुते, शीतल मानतकर, विजय पाठक आणि शेख मुनाफ यांनी परिश्रम घेतले.

# हिंगोलीत क्रिडा शिक्षण विभाग, पतंजली योग समितीची जनजागृती

## शिक्षक, विद्यार्थ्यांसह नागरिकांचा सहभाग





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**
जागतिक योग दिनानिमित्त योग करा निरोगी रहा, एक दोन तीन चार योग करा वारंवार अशा घोषणा देत हिंगोली शहरात क्रीडा व शिक्षण विभाग, पतंजली योग समितीच्या वतीने जनजागृती रॅली काढण्यात आली. सरजूदेवी व माणिक स्मारक विद्यालयाच्या प्रांगणातून सकाळी आठ वाजता सुरू झालेल्या या रॅलीस उपशिक्षणाधिकारी शिवलिंग साखरकर यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरुवात केली.
यावेळी सहाय्यक क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, पतंजलीचे भारत स्वाभिमान राज्य सह प्रभारी कुंडलिक निर्मले, पतंजली योग समिती पदाधिकारी एकनाथ बांगर, बालासाहेब हरण, उमेश तोष्णीवाल, अशोक पवार, बालाजी पालवे, पंडितराव गुट्टे, शितलताई तापडिया, कांता कल्याणकर, सरिता काबरा, प्रभा काबरा, सारिका कयाल आदीसह सरजूदेवी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका माधवी गुंडेकर, उपमुख्याध्यापक यु.के.येरेकार, विपुल भारुका, संजय भुमरे, चंद्रकांत विभूतीनारायण, सी.एस.काळबांडे, जी.एस. गोविंदपुरकर, मुक्ता नरवाडे, सोनल जैस्वाल आदी शिक्षक आणि माणिक स्मारक विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास राठोड, आशिक इकबाल, शिवराज सरनाईक, अजय गोरे एन.टी.सोळंके, एस बी खटाने हे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आज आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

# जलजीवन मिशनच्या कामाला विलंब करणाऱ्या कंत्राटदारावर कठोर कारवाई– जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**
जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या विविध नळ पाणीपुरवठा योजनांची कामे तात्काळ पूर्ण करून संबंधित गावांमध्ये नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित यंत्रणांना दिले. तसेच विहित कालावधीत काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांविरुद्ध कठोर भूमिका घेत त्यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.
जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामांचा सविस्तर प्रगती आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.
या बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृद्धी दिवाणे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, संबंधित विभागांचे अधिकारी, जलजीवन मिशनचे अभियंते तसेच विविध यंत्रणांचे प्रतिनिधी उपस्थित होते.
या बैठकीत जिल्ह्यातील विविध नळ पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती, प्रलंबित कामे, तांत्रिक अडचणी आणि योजनांच्या कार्यान्वयनाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. अंतिम टप्प्यात असलेल्या योजनांची कामे वेगाने पूर्ण करून ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध, सुरक्षित आणि नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला.
यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी प्रत्येक योजनेच्या प्रगतीचा आढावा घेत कामांमधील अडथळे दूर करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. ज्या योजनांची कामे पूर्णत्वास आली आहेत, त्या योजनांचे तात्काळ कार्यान्वयन करून लाभार्थी गावांमध्ये नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.
महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत राबविण्यात येत असलेल्या डोंगरकडा, आरळ यासह इतर पाणीपुरवठा योजनांच्या प्रलंबित कामांचाही आढावा यावेळी घेण्यात आला. ज्या कंत्राटदारांकडून निर्धारित कालमर्यादेत कामे पूर्ण होत नाहीत, त्यांची नावे शासनाच्या सचिवांना कळवून त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. तसेच येत्या कालावधीत दरमहा किती कामे पूर्ण होणार आहेत, याचा सविस्तर कृती आराखडा तयार करून सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. सादर केलेल्या नियोजनानुसार प्रत्यक्षात कामे पूर्ण होत आहेत की नाही, यावर नियमित लक्ष ठेवण्यास सांगितले.
या बैठकीत जलजीवन मिशन अंतर्गत त्रयस्थ तांत्रिक तपासणी करण्यात आलेल्या योजनांचाही आढावा घेण्यात आला. तपासणीदरम्यान निदर्शनास आलेल्या सर्व त्रुटी, तांत्रिक उणिवा व प्रलंबित बाबींची पूर्तता करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.
जलजीवन मिशनच्या माध्यमातून प्रत्येक ग्रामीण कुटुंबापर्यंत सुरक्षित पिण्याचे पाणी पोहोचविण्याचे उद्दिष्ट असून, योजनेची सर्व कामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी केले.
दरम्यान, जून महिना संपत आला असून अजूनही पावसाला सुरूवात झाली नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील विहीरी, नद्या तसेच पाण्याचे स्त्रोत आटल्याचे दिसत आहेत. ग्रामीण भागात नागरिकांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. तर दुसरीकडे जलजीवन मिशनची कामे धिम्या गतीने सुरू असल्याचे दिसत आहेत. काही गावांमध्ये जलजीवन मिशनचे काम पूर्ण होऊनही नागरिकांना पाणी मिळत नसल्याच्या तर काही ठिकाणी काम निकृष्ट दर्जाचे झाल्याच्या तक्रारी वारंवार येत आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### बाबुराव ढोकणे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड



हिंगोली– ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंडस सर्कलच्या जिल्हाध्यक्ष पदी बाबुराव ढोकणे यांची निवड संघटनेच्या पदाधिकारी यांनी केल्याचे नियुक्ती पत्र ढोकणे यांना देण्यात आले. संघटनेच्यावतीने पत्रकारांना पुरस्कार देणे, यासह सामाजिक उपक्रम राबविणे, आदी कार्यक्रम घेत असते. केंद्रीय अध्यक्ष यासिन पटेल, विश्वस्त गणेश कोळी, केंद्रीय सचिव अतुल होनकळसे यांनी बाबुराव ढोकणे यांची जिल्हाध्यक्ष पदी निवड केली आहे. जिल्ह्यात संघटनेच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम घेऊन संघटनेला उभारी देऊ असे त्यांनी सांगितले. निवडी बद्दल अनेक पत्रकारांनी शुभेच्छा दिल्या.

### जागतिक योग दिनानिमित्त योग स्पर्धा

हिंगोली– राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत जिल्हा सामान्य रूग्णालयात शुक्रवारी योग स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बालकांनी सहभाग नोंदवला होता. यावेळी अधिष्ठाता डॉ चक्रधर मुंगल, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ नितीन तडस, आरोग्य अधिकारी डॉ कैलाश शेळके, डॉ दिपक मोरे आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयुष विभागाने परिश्रम घेतले.

# कारची काच फोडून १० लाख पळवणारी आंतराज्य टोळी जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**
वसमत शहरात वडिलांच्या ऑपरेशनसाठी बँकेतून दहा लाख रूपयांची रोकड कारची काच फोडून लंपास करणाऱ्या आंतरराज्य टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले असून आंध्र प्रदेशातील दोन आरोपींना त्यांच्या मुळ गावातून अटक करीत ५ लाख रूपये जप्त करण्यात आले आहेत. पोलिसांनी ७० ठिकाणचे सीसीटीव्ही तपासत चोरट्यांचा छडा लावला आहे.
वसमत तालुक्यातील पळसगाव येथील प्रशांत डाखोरे यांनी दि ९ जून रोजी वडिलांच्या ऑपरेशनसाठी युनीयन बँकेतून १० लाख रूपयांची रक्कम काढली होती. सदर रक्कम कारमध्ये ठेवून ते परत बँकेत गेले असता चोरट्यांनी कारची काच फोडून १० लाख रूपये असलेली बॅग पळविली. याप्रकरणी वसमत शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.
याप्रकरणात पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी तातडीने गुन्हे शाखेचे पथक स्थापन केले. पोलिस निरीक्षक मोहन भोसले, उपनिरीक्षक माधव जिव्हारे, जमादार भुजंग कोकरे, शिवाजी जालमीरे, किशोर सावंत, विशाल खंडागळे, आजम प्यारेवाले, ज्ञानेश्वर गोरे, साईनाथ कंठे, मुनीर मुन्नीवाले, शंकर हराळ, दत्ता नागरे, प्रदीप झुंगरे यांचा समावेश होता. या पथकाने घटनास्थळाच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यातून दुचाकीवर आलेल्या चोरट्यांची ओळख पटण्यास मदत झाली. त्यानंतर पोलिसांनी सलग ११ दिवस वसमत, नांदेड, पूर्णा भागासह आंध्र प्रदेशच्या सीमेवरील काही गावात एकूण ७० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. यामध्ये चोरट्यांची आओळख पटल्यानंतर पोलिसांनी थेट तिपा बिटरगुंडा जि नेल्लोर गाठले. त्याठिकाणी पोलिसांनी प्रदीप राजू पेटला आणि मधू जवहा भास्कर या दोघांना ताब्यात घेतले.
पोलिसांनी त्यांची अधिक चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून ५ लाख रूपये जप्त केले आहेत. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# यूपीएससी मुख्य परीक्षा व मुलाखत पूर्वतयारीसाठी अमृततर्फे अर्थसहाय्य

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**
महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तसेच अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) नागरी सेवा मुख्य परीक्षा व मुलाखत पूर्वतयारीसाठी प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य योजना सन २०२६-२७ मध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत.
अमृतच्या लक्षित गटामध्ये ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पाटील, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुंथर, गुजराती, जाट, हिंदू नेपाळी, भूमिहार, लोहारणा, कानबी आदी समाजघटकांचा समावेश आहे.
सन २०२६-२७ मध्ये संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षा-२०२६ मध्ये उत्तीर्ण झालेल्या आणि या योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या पात्र उमेदवारांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावेत. अर्ज भरण्यापूर्वी संबंधित सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करून त्यानुसार अर्ज सादर करावा.
योजनेअंतर्गत पात्र उमेदवारांना नागरी सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी ५० हजार रुपये इतके प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. तसेच मुलाखत फेरीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखत पूर्वतयारीसाठी २५ हजार रुपये इतके अर्थसहाय्य प्रदान करण्यात येणार आहे. ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी अमृतच्या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा. योजनेबाबतची पुढील सर्व माहिती, सूचना व अद्यतने केवळ अमृतच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी अथवा ऑनलाइन अर्ज भरण्याबाबत काही अडचण अथवा शंका असल्यास संबंधित जिल्हा अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा. ऑनलाइन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १९ जुलै २०२६ असून पात्र उमेदवारांनी मुदतीपूर्वी अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय बालरोग तज्ज्ञ परिषदेचे हिंगोलीत यशस्वी आयोजन

## सर्पदंश, दमा आणि आकडी आजारांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**
भारतीय बालरोग संघटना शाखा हिंगोली, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि बालरोग विभाग जिल्हा सामान्य रुग्णालय हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमानाने आज शनिवार, दिनांक २० जून २०२६ रोजी शहरातील हॉटेल शांती येथे एका भव्य बालरोगतज्ज्ञ परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत बालकांमधील गंभीर आजार आणि आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीवर महाराष्ट्रातील नामवंत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले.
या परिषदेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले नामवंत बालरोगतज्ज्ञ हे होते. परिषदेत प्रामुख्याने बालकांमधील महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने झाली. त्यामध्ये आपत्कालीन परिस्थिती आणि अपघात: लहान मुलांमध्ये होणारे अपघात आणि त्यावेळचे प्रथमोपचार.
सर्पदंश आणि विंचूदंश: साप किंवा विंचू चावल्यानंतर बालकांवर करायचे तातडीचे व जीवरक्षक उपचार, बालपणीचा दमा बदलत्या वातावरणामुळे मुलांमध्ये वाढणारा दम्याचा आजार आणि त्यावरील आधुनिक उपचार पद्धती, आकडीचे आजार यामध्ये लहान मुलांमध्ये येणारी आकडी (फिट्स) आणि त्याचे वेळीच निदान व व्यवस्थापन या सर्व गंभीर विषयांवर उपस्थित डॉक्टरांना अत्यंत सविस्तर आणि तांत्रिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.
या परिषदेच्या अध्यक्षस्थानी भारतीय बालरोग संघटना हिंगोली शाखेचे अध्यक्ष डॉ दीपक नारायण मोरे हे होते. तर सचिव डॉ गोपाल शंकरराव कदम आणि कोषाध्यक्ष डॉ आशुतोष माहुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. हिंगोली जिल्ह्यातील व परिसरातील सर्वच बालरोगतज्ज्ञ या परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित होते.
व्याख्याते म्हणून लाभलेले दिग्गज डॉक्टर
महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमधून आलेल्या ज्या प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञांनी आपल्या अनुभवातून उपस्थितांना मार्गदर्शन केले, त्यामध्ये डॉ परमानंद आनंद, डॉ प्रवीण गोखले, डॉ दयानंद नखाते, डॉ कुंदन चोपडे बोराळकर डॉ महेश सुलक्षणे, डॉ स्नेहल नगरे, डॉ अण्णासाहेब लोखंडे या सर्व तज्ज्ञ डॉक्टरांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन करून उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले.
हा शैक्षणिक व वैद्यकीय उपक्रम यशस्वी रीतीने पार पाडण्यासाठी बालरोगतज्ज्ञ संघटना शाखा हिंगोली, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा सामान्य रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स, परिचारिका व कर्मचारी वृंदाने अहोरात्र परिश्रम घेतले. या परिषदेमुळे हिंगोली व परिसरातील बालरोग वैद्यकीय सेवेचा दर्जा सुधारण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास संयोजकांनी व्यक्त केला आहे.

# शांताबाई दराडे विद्यालयात सिकलसेल दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जून**
जागतिक सिकलसेल दिनानिमित्त भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली हिंगोली येथे सिकलसेल आजाराबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सिकलसेल आजार व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत संपन्न झाला.
यावेळी तालुका सिकलसेल कार्यक्रम सहाय्यक श्री. पंजाब गायकवाड यांनी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांना सिकलसेल आजाराची माहिती देत आजाराची लक्षणे, तपासणीचे महत्त्व, उपचारपद्धती, घ्यावयाची काळजी तसेच सिकलसेल बाधित व्यक्तींना शासनामार्फत मिळणाऱ्या विविध सुविधांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सिकलसेल आजाराचे वेळेत निदान व उपचार केल्यास त्याचे दुष्परिणाम टाळता येतात, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे, जनार्दन होडगीर, उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार, पर्यवेक्षक भारत शिंदे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, आरोग्य सेविका सौ. लोणे, आशा सेविका तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सिकलसेल आजाराबाबत जागरूकता निर्माण होऊन प्रतिबंध, तपासणी व उपचार यांचे महत्त्व अधोरेखित झाले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणास प्रारंभ

## नांदेड दक्षिण मतदारसंघातील प्रक्रियेची जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी केली पाहणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० जुन -**
भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या SIR (Special Intensive Revision) विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची घोषणा केली असून हा कार्यक्रम २० जून ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात मतदारांचे गणना प्रपत्र डाउनलोड करून ते संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल



कर्डीले यांनी ८७दक्षिण नांदेड विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक विभागाला भेट देऊन गणना फॉर्म डाउनलोड प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत प्रक्रिया वेळेत आणि अचूकपणे पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

या पाहणीदरम्यान उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने उपस्थित होते. तसेच ८७नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक मतदार नोंदणी अधिकारी नितेशकुमार बोलोलू यांनी सुरू असलेल्या प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली.

मतदार यादी अद्ययावत व अचूक ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाच्या या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

नांदेड जिल्ह्यातील मतदारांची संख्या २७७७०७३ एवढी असून छपाई करावयाच्या गणना प्रपत्राची दुप्पट म्हणजे ५५५४१४६ एवढी आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

# मुक्रमाबाद येथे शिवसेनेचे 'जोडे मारो' आंदोलन

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २० जुन -**
शिवसेनेचे सहा खासदार पक्षाच्या भूमिकेविरोधात गेल्याच्या आरोपांनंतर शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेला संताप अखेर रस्त्यावर उतरला असून मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद शहरात शिव सेना विधानसभाप्रमुख मन्मथ खंकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसैनिकांनी जोरदार निषेध आंदोलन केले.

दि. १९ रोजी दुपारी मुक्रमाबाद शहरातील शिवसैनिक एकत्र आले आणि प्रचंड घोषणाबाजी करत खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्याविरोधात रोष व्यक्त केला. गद्दार खासदार नागेश पाटील मुर्दाबाद, शिवसेना अंगार है, बाकी सब भंगार है, जय भवानी, जय



शिवाजी, शिवसेना के गद्दारों को, जूते मारो सालों को, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून निषेध नोंदवला. त्यानंतर घोषणाबाजी करत पुतळ्याचे दहन करण्यात आले.

या आंदोलनात शिवसेना विधानसभाप्रमुख मन्मथ खंकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे गंगाधर चामलवाड, सदाशिव घाळे, बालाजी कदम अनिल बेल्लेवार, प्रसाद देवणे, तालब कोतवाल, अमन शेख, गुल्लु चौधरी, राम कोळेकर यांच्यासह अनेक शिवसैनिक सहभागी झाले होते. त्यांनी पुढाकार घेत 'जोडे मारो' आंदोलन करत पक्षनिष्ठेचा संदेश

# मुगट ग्रामपंचायत आरक्षण सोडतीवर आक्षेप

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २० जुन -**
मुदखेड तालुक्यातील मुगट ग्रामपंचायतीच्या २०२६ सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या आरक्षण सोडतीवर ग्रामस्थांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. शासन निर्णय व लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आरक्षण निश्चित न करता चुकीचे आरक्षण दिल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी तहसीलदार यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.१२ जुन रोजी मुगट ग्रामपंचायतीच्या सदस्य पदांसाठी आरक्षण जाहीर करण्यात



आले आहे. या आरक्षण सोडती मध्ये ओबीसीची संख्या ४ सदस्यावरून ३ सदस्य करण्यात आली.

एक सदस्य का कमी करण्यात आले याबाबद मुगट गावातील ओबीसी समाज बांधवांनी आक्षेप घेतला व अक्षेप अर्ज तहसीलदार यांना देण्यात आला आहे.

ग्रामस्थ बाळू राऊत यांनी सांगितले की,ओबीसी समाजावर अन्याय होत आहे. आम्ही याबत हरकत अर्ज दाखल केला असून, पारदर्शक चौकशी करून योग्य तो न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.

यावेळी बाळु राऊत, संभाजी जाधव, वैभव गजेले,माधव जाधव,स्वप्नील हाटकर,नामदेव धोंगडे, ज्ञानेश्वर गजले, संतोष जाधव,विजय आढाव, यांची उपस्थीती होती.

# भोकर येथे खा.आष्टीकरसह इतर खासदारांची प्रतिकात्मक अंत्ययात्रा

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २० जुन -**
शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहा खासदार पक्षाशी गद्दारी करुन ते शिंदे गटात गेल्याने शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून गेल्या चार दिवसांपासून शिवसैनिकांत सुरू असलेला संताप अखेर रस्त्यावर उतरला असून जिल्हासंघटक सूभाष नाईक किनीकर ,माजी जि.प.सदस्य सूनिल चव्हाण, शहरप्रमुख पांडूरंग वर्षेवार, दिव्यांग सेना तालुका प्रमुख विठ्ठलराव देवड,तालुका संघटक,नंदू पा .कौठेकर,शहर संघटक राहूल पा. कोंडलवार,माजी तालुका प्रमुख वामन पर्वत, उपतालुकाप्रमुख मारोती पवार, चेअरमन गंगाधर महादवाड, साहेबराव भोंबे रमेश महागावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसैनिकांनी जोरदार निषेध व जोडेमारो आंदोलन करत सहा खासदारांची प्रतिकात्मक प्रेत अंत्ययात्रा काढण्यात आली.

दि. २० रोजी सकाळी ११



च्या सूमारास शहरातील किनवट रोड येथील घिसेवाड कॉलेज येथुन उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसैनिकांनी एकत्र आले आणि प्रचंड घोषणाबाजी करत खासदार नागेश पाटील आष्टीकर व इतर खासदारांची अंत्ययात्रा काढुन रोष व्यक्त केला. गद्दार खा. नागेश पाटील मुर्दाबाद, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. आंदोलनात असंख्य शिवसैनिक सहभागी झाले होते. यावेळी वसंत लखा जाधव,सर्जेराव शिंदे, गोविंद पा.सानमवाड,अजय चव्हाण,कैलास कदम,दत्तु पा.दिवशीकर तानाजी पा.जाधव, श्रीनिवास शिवायगार, सायारेड्डी प्रेमयगार,नागभुषन गायकवाड, अविनाश गमेवाड,मारोती काळेकर, अंकुश बशीटवाड, सचिन कोरटलावाड,मारोती आरगेवार आदी शिवसैनिक उपस्थित होते.यावेळी पोलीस निरीक्षक पल्लेवाड यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



## बालाजी आलेवार यांच्याकडे भाजप दक्षिण मंडळाची धुरा

**इस्लापूर** -भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी पक्ष नेतृत्वाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत बालाजी किशनराव आलेवार यांची किनवट दक्षिण मंडळाच्या तालुका अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. पक्षनिष्ठा, संघटन कौशल्य, कार्यकर्त्यांशी असलेला सुसंवाद आणि जनसामान्यांमध्ये निर्माण केलेली विश्वासार्हता याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते तथा किनवट-माहूर मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम आणि भाजप नांदेड जिल्हाध्यक्ष किशोरभाऊ देशमुख यांच्या हस्ते आलेवार यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत करून अभिनंदन केले. बालाजी आलेवार हे गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेवर निष्ठा ठेवून कार्यरत आहेत. विविध सामाजिक, राजकीय व जनहिताच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला असून पक्ष संघटनेच्या वाढीसाठी त्यांनी केलेले योगदान लक्षणीय मानले जाते. ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना एकत्रित करून संघटन मजबूत करण्यामध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे.

नियुक्तीप्रसंगी आमदार भीमराव केराम यांनी सांगितले की, भारतीय जनता पक्षाची ताकद ही कार्यकर्त्यांमध्ये आहे. बालाजी आलेवार यांच्यासारख्या निष्ठावंत व सक्रिय कार्यकर्त्यांकडे जबाबदारी दिल्यामुळे पक्ष संघटन आणखी मजबूत होईल. केंद्र व राज्य शासनाच्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा.तर जिल्हाध्यक्ष किशोरभाऊ देशमुख यांनी, किनवट दक्षिण मंडळामध्ये भाजपची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी बालाजी आलेवार सक्षम नेतृत्व देतील. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि पक्षविस्ताराच्या दृष्टीने त्यांची नियुक्ती महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असा विश्वास व्यक्त केला. नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना बालाजी आलेवार म्हणाले, पक्ष नेतृत्वाने माझ्यावर दाखविलेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. प्रत्येक कार्यकर्त्याला सोबत घेऊन पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी, बूथस्तरावर पक्षाची ताकद वाढविण्यासाठी आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. दरम्यान, त्यांच्या निवडीचे संपूर्ण किनवट दक्षिण परिसरात स्वागत होत असून भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, व्यापारी, शेतकरी आणि युवक वर्गाकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे किनवट दक्षिण भागातील भाजप संघटनाला नवी दिशा व नवी ऊर्जा मिळेल, अशी भावना कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. राजकीय वर्तुळातही या नियुक्तीची चर्चा सुरू असून आगामी काळात किनवट दक्षिणमध्ये भाजपची संघटनात्मक ताकद आणखी वाढण्यास मदत होणार असल्याचे बोलले जात आहे.

## 'तांड्याचे पाय' कथासंग्रहाला परिमल सांस्कृतिक साहित्य पुरस्कार प्रदान

**आदमपूर** -परिमल सांस्कृतिक व्यासपीठ (रोपळे बु., ता. पंढरपूर) च्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार वितरण सोहळा अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला.हॉटेल राधाकृष्ण कराड रोड, पंढरपूर येथे आयोजित या सोहळ्यात संपूर्ण महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या ३१ गुणवंत साहित्यिकांना त्यांच्या उत्कृष्ट साहित्यकृतींसाठी वेगवेगळ्या श्रेणीत राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये नांदेड येथील लेखिका अनिता जाधव यांच्या 'तांड्याचे पाय' या कथासंग्रहाला 'कथा परिमल राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला.या सोहळ्याच्या मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, मराठी साहित्य परिषद (पंढरपूर शाखा) चे अध्यक्ष सिद्धार्थ ढवळे, युवा नेते प्रणव परिचारक, तसेच आदर्श माता पुष्पलता निकम आणि परिमल सांस्कृतिक व्यासपीठाचे अध्यक्ष सचिन कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते अनिता जाधव यांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत करताना परिमलचे अध्यक्ष सचिन कुलकर्णी यांनी संस्थेच्या साहित्यिक व सांस्कृतिक प्रवासाचा आढावा घेतला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात पुरस्कारप्राप्त साहित्यिकांच्या लेखनाचा गौरव करत, अशा पुरस्कारांमुळे दर्जेदार साहित्याला व नव्या लेखकांना मोठी प्रेरणा मिळते, असा विश्वास व्यक्त केला. या सोहळ्याला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले साहित्यिक, रसिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारंपारिक शाहीर लोककला संवर्धन मंडळ नांदेड जिल्हा महिला सचिव पदी मीराताई जाधव यांची निवड

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २० जुन -**
कलावंताच्या न्याय हक्काकरिता सदैव तत्पर असलेल्या पारंपारिक शाहिर लोककला संवर्धन मंडळ नांदेड जिल्हा सचिव महिला पदी सौ. मिराताई गजानन जाधव यांची पारंपारिक शाहीर लोककला संवर्धन मंडळाचे संस्थापक अध्यक्ष त्रिरत्नकुमार मा.भवरे कामारीकर यांच्या आदेशान्वये महिला प्रदेशाध्यक्षा उज्वलाताई भवरे मराठवाडा अध्यक्ष शाहिर बापूरावजी जमदाडे जिल्हा सचिव शाहिर सुभाषजी गुंडेकर जिल्हा उपाध्यक्ष रमेश सर्फे जिल्हा संघटक राजू रणवीर यांनी नियुक्तीपत्र देऊन निवड केली असून गायिका मीराताई जाधव यांचे सामाजिक सांस्कृतिक कार्य उल्लेखनीय असून त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली आहे.

त्यामुळे त्यांनी नांदेड जिल्ह्यातील वयोवृद्ध कलावंत महिला यांना संघटित करण्याचा प्रयत्न करून गाव तिथे शाखा स्थापन करू व कलावंताच्या न्याय हक्कासाठी लढा देण्याकरता व त्यांच्या अडचणी सोडविण्याकरिता मी सदैव प्रयत्नशील राहील अशी ग्वाही गायिका मीराताई जाधव यांनी दिली असून महिलांना संघटित एकजुठ करण्याचा माझा मानस असल्याचे त्यांनी सांगितले असुन मी त्यासाठी नांदेड जिल्ह्यामध्ये एक दौरा काढणारा असून उपेक्षित असलेले वयोवृद्ध महिला कलावंत यांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण सज्ज असणार असेही मीराताई जाधव यांनी याप्रसंगी सांगितलेआहे त्यामुळे सौ. मिराताई जाधव यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

# माळाकोळी ग्रामपंचायतच्या कारभाराला कंटाळुन गावातील नागरिकानी स्वयंस्फुर्तीने घेतला स्वच्छतेचा पुढाकार

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २० जुन -**
माळाकोळी ग्रामपंचायतच्या कारभाराला कंटाळून नागरिकानी स्वयंस्फुर्तीने गाव स्वच्छ करण्याचा घेतला पुढाकार घेत गावाती नाल्या स्वच्छ करण्याची मोहीम राबवून एक आदर्श निर्माण केला आहे.नागरिकच गांव स्वच्छ करत आसेल तर तालुक्यासाठी गटविकास अधिकारी व ग्रामसेवक सक्षम नाही यांची शासनादेश या दोघाची उचलबांगडी करुन सक्षम अधिकारी यांची नियुक्ती कराली अशी मागणी होत आहे.

माळाकोळी ग्रामपंचायतीच्या कारभाराला कंटाळून माळाकोळी गावातील नागरिकानी स्वतः नाल्या स्वच्छ करून गावपातळीवर शासनाचे अधिकारी व कर्मचारी सक्षम आहेत यांचे उदाहरण दाखवून दिले.

गावातील सांडपाणी, तुंबलेल्या नाल्या व अस्वच्छतेबाबत वारंवार ग्रामपंचायत सदस्य, सरपंच तसेच ग्रामपंचायत कार्यालयाला निवेदनाद्वारे माहिती देऊनही लग्रामपंचायत प्रशासनाकडून निधी उपलब्ध नाही असे उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. जर दग्रामपंचायतीकडे निधीच नव्हता, तर १४ वा व १५ वा वित्त आयोग, मनरेगा आणि इतर विकास योजनांमधून प्राप्त झालेला लाखो रुपयांचा निधी नेमका गेला कुठे? हा प्रश्न आता गावातील युवक आणि नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाने गावाचा कारभार पारदर्शक ठेवण्याऐवजी माहिती लपविण्याची भूमिका घेतल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने विकासकामांवर झालेला खर्च, प्राप्त निधी आणि त्याचा वापर याचा संपूर्ण हिशोब ग्रामसभा व गावकऱ्यांसमोर जाहीर



करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

यावेळी भालेराव पाटील, रितेश केंद्रे, ऋतिक जोंधळे, संदीप मस्के, सचिन होनमोडे, ओम साखरे, शिवा मुस्तापुरे, आदर्श भालेराव, मंगेश मुसळे, सचिन मुंडे, आशिष मुस्तापुरे, तुषार कुलकर्णी, ऋषी मुस्तापुरे, अनिकेत मंगनाळे, अक्षय सांगळे, विजय भालेराव, सुशांत लव्हारे, श्रीकांत केंद्रे, अजय तिडके, विजय तिडके, गोविंद केंद्रे, सूर्या केंद्रे, धनंजय तिडके, सोहेल गहेरवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# दैनंदिन जीवनात योगाभ्यास महत्त्वाचा : जी.एस. ढवळे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० जुन -**
मानवाच्या दैनंदिन जीवनात योग अभ्यासाचे महत्त्व अनन्यसाधारण असे असून आजच्या धावपळीच्या आणि धक्काधकीच्या आयुष्यात आरोग्याच्या दृष्टीनेही योगाचे महत्त्व वाढलेले आहे. शालेय जीवनापासूनच याची सुरुवात करताना सर्व शाळांनी परिपाठात योगासनांचा अंतर्भाव करावा असे आवाहन लोहा तालुक्यातील जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जी. एस. ढवळे यांनी केले. जागतिक योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी सहा दिवसघेण्यात आलेल्या योग शिबिराच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते.

शाळेत राबविल्या जाणाऱ्या शालेय तथा सहशालेय उपक्रमांबरोबरच दररोज एक योगासन हा पाच मिनिटांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. कपालभाती, भस्त्रिका, अनुलोम विलोम आदी प्राणायामाबरोबरच सोमवार-ताडासन, मंगळवार- वृक्षासन, बुधवार- पादहस्तासन, गुरुवार- भद्रासन, शुक्रवार- भुजंगासन, शनिवार- पवनमुक्तासन असे आठवड्याचे वेळापत्रक शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी तयार केले आहे. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, ज्या मूल्य संस्कारांची आज आवश्यकता भासत आहे त्यात शालेय अभ्यासक्रमात योग-विज्ञान हा शास्त्रीय महत्त्व जपणारा पाठ्यक्रम समाविष्ट केला पाहिजे.

सहशिक्षक एस.एम. घटकार आणि विषय शिक्षक उमाकांत बेंबडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदरील उपक्रमात गावकऱ्यांचेही सहकार्य लाभले असून माजी सरपंच साहेब शिखरे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गोडबोले, माजी अध्यक्ष किशन गच्चे, तुकाराम गोडबोले, रोहिदास गोडबोले, पुरभाजी गोडबोले, श्रीरंग गच्चे, पांडुरंग गच्चे, मनिषा गच्चे, मारोती चक्रधारी, हैदर शेख, कमलबाई गच्चे, हरिदास पांचाळ, रमा गोडबोले, आनंद गोडबोले आदींनी सहकार्य केले.

# मुखेड काँग्रेसची बूथनिहाय 'बीएलए' यादी निवडणूक प्रशासनाकडे सुपूर्द

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० जुन -**
आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुखेड विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाकडून संघटनात्मक तयारीला वेग आला आहे.९१-मुखेड विधानसभा मतदारसंघासाठी पक्षाच्या वतीने बूथनिहाय 'बीएलए' (बूथ लेव्हल एजंट) च्या नेमणुका पूर्ण करण्यात आल्या असून,ही अधिकृत यादी निवडणूक प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आली आहे.

काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजीव पाटील रावणगावकर आणि शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांनी ९१-मतदान नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मा.अनुप पाटील आणि मुखेडचे तहसीलदार यांच्याकडे ही यादी अधिकृतपणे दाखल केली.

माजी आमदार बेटमोगरेकर यांचे मार्गदर्शन

मुखेड विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही बूथनिहाय बीएलए यादी अत्यंत सूक्ष्मपणे आणि नियोजनबद्ध पद्धतीने तयार करण्यात आली . आहे.निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राहावी आणि प्रत्येक बूथवर पक्षाची पकड मजबूत व्हावी,यासाठी या नेमणुका अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

यादी सुपूर्द करतेवेळी प्रशासकीय कार्यालयात काँग्रेस पक्षाचे अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी डॉ. श्रावण रॅपणवाड (महासचिव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस) राजीव पाटील रावणगावकर (तालुकाध्यक्ष) हणमंत नारनाळीकर (शहराध्यक्ष) बालाजी वाडेकर (शहर उपाध्यक्ष), एम.आर.गोपणर (युवक काँग्रेस तालुका उपाध्यक्ष),इरफान मोमीन,नारायण येरेवाड,बशिर पटेल,बबलु शेख,सद्दाम इब्राहीम शेख रावणगावकर या सर्वांच्या उपस्थितीत निवडणूक प्रशासनाकडे ही यादी सोपवण्यात आली असून,मुखेड मतदारसंघात काँग्रेसने निवडणूक कामात आघाडी घेतल्याचे चित्र दिसत आहे.



## राज्यसभा सदस्य राजेंद्र जैन यांची आ. चिखलीकर यांच्या कार्यालयास भेट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० जुन -**
राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनिर्वाचित खासदार राजेंद्र जैन यांनी आज आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष या जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी समस्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड आणि आ. चिखलीकर परिवाराच्या वतीने खा . जैन यांचे मनः पूर्वक स्वागत केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस मोहम्मद कान पठाण, भाजपाच्या महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा सौ.प्रणिताताई देवरे चिखलीकर, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, उदय चव्हाण समवेत नांदेड महानगर, ग्रामीणचे कार्यकर्ते, पदाधिकारी आदि उपस्थित होते. या भेटीत खा. जैन यांनी आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, पक्षाची संघटनात्मक बांधणी, आगामी ध्येय धोरणे याबाबत आ. चिखलीकर यांच्याशी सखोल चर्चा केली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बिट्टू आणि हॅपीसोबत योग, मजा आणि आरोग्याचा एक अनोखा संगम

मुंबई. आरोग्य आणि फिटनेस मजेदार असू शकत नाही, असे कोण म्हणतो? आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, निक इंडियाने आय.आय.एम.यू.एन. (इंडियाज इंटरनॅशनल मुव्हमेंट टू युनाईट नेशन्स) सोबत भागीदारी करून योगाला मजा आणि उत्साहासोबत जोडले. जगातील सर्वात मोठ्या युवा-नेतृत्वाखालील संस्थांपैकी एक असलेल्या आय.आय.एम.यू.एन.च्या सहकार्याने आयोजित केलेल्या, 'स्पार्क अ चेंज फाऊंडेशन'मधील या विशेष कार्यक्रमाचा उद्देश मुलांना आणि कुटुंबांना योगाचे महत्त्व पटवून देणे हा होता. निक इंडिया आणि आय.आय.एम.यू.एन. आणि संयुक्तपणे मुलांसाठी आणि त्यांच्या कुटुंबांसाठी एक संवादात्मक योग सत्र आयोजित केले, जे योग प्रशिक्षक रजनी पवार यांनी घेतले. सहभागींना सोपी योगासने, स्ट्रेचिंग व्यायाम आणि श्वासोच्छ्वास तंत्र शिकवण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश मुलांना सक्रिय जीवनशैली स्वीकारण्यास आणि मजेदार पद्धतीने निरोगी सवयी शिकण्यास प्रेरित करणे हा होता.

## डब्ल्यूपीयू गोवा उच्च शिक्षणात ट्रान्सडिसिप्लिनरी दृष्टिकोनाला समर्थन देत आहे

**मुंबई:** आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि वेगवान तंत्रज्ञान बदल जगभरातील उद्योगांना नवा आकार देत असताना युनिव्हर्सिटीजनी विद्यार्थ्यांना केवळ त्यांच्या पहिल्या नोकरीसाठी तयार करण्यापलीकडे जाणे आवश्यक आहे. त्याऐवजी, त्यांना आयुष्यात येणाऱ्या अनेक करिअर बदलांना यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी सक्षम बनवले पाहिजे, असे मत २० जून रोजी आयोजित वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी (डब्ल्यूपीयू) गोवा ओपन हाऊसमध्ये प्रवक्त्यांनी व्यक्त केले.या इव्हेण्टमध्ये भावी विद्यार्थी, पालक आणि शिक्षणतज्ज्ञ एकत्र आले होते. वाढत्या अनपेक्षित जगात उच्च शिक्षणाचे भविष्य आणि युनिव्हर्सिटीजकडून बदलत असलेल्या अपेक्षा यावर यावेळी सखोल चर्चा झाली. या संपूर्ण संवादाच्या केंद्रस्थानी डब्ल्यूपीयू गोवाचे ट्रान्सडिसिप्लिनरी शैक्षणिक मॉडेल होते, जे एखाद्या विषयाच्या सखोल अभ्यासासोबत विविध क्षेत्रांचा एकत्रित विचार करण्याची क्षमता, बदल स्वीकारण्याची तयारी आणि वास्तविक जगातील गुंतागुंतीच्या आव्हानांना तोंड देण्याचे कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न करते.

## डब्ल्यूपीयू गोवा उच्च शिक्षणात ट्रान्सडिसिप्लिनरी दृष्टिकोनाला समर्थन देत आहे

**मुंबई:** आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि वेगवान तंत्रज्ञान बदल जगभरातील उद्योगांना नवा आकार देत असताना युनिव्हर्सिटीजनी विद्यार्थ्यांना केवळ त्यांच्या पहिल्या नोकरीसाठी तयार करण्यापलीकडे जाणे आवश्यक आहे. त्याऐवजी, त्यांना आयुष्यात येणाऱ्या अनेक करिअर बदलांना यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी सक्षम बनवले पाहिजे, असे मत २० जून रोजी आयोजित वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी (डब्ल्यूपीयू) गोवा ओपन हाऊसमध्ये प्रवक्त्यांनी व्यक्त केले.याया संपूर्ण संवादाच्या केंद्रस्थानी डब्ल्यूपीयू गोवाचे ट्रान्सडिसिप्लिनरी शैक्षणिक मॉडेल होते, जे एखाद्या विषयाच्या सखोल अभ्यासासोबत विविध क्षेत्रांचा एकत्रित विचार करण्याची क्षमता, बदल स्वीकारण्याची तयारी आणि वास्तविक जगातील गुंतागुंतीच्या आव्हानांना तोंड देण्याचे कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न करते.

## 10 दशलक्षाहून अधिक लोक योग सप्ताहात सामील

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ च्या निमित्ताने, भारताच्या सवयी लावणाऱ्या वेलनेस प्लॅटफॉर्म, हॅबिल्डने आपला १० वा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. केवळ एका आठवड्यात १० दशलक्षाहून अधिक लोक त्यांच्या योग चळवळीत सामील झाले, ज्यामुळे ही जगातील सर्वात मोठ्या सामुदायिक वेलनेस मोहिमांपैकी एक ठरली आहे. या चळवळीत अभूतपूर्व सहभाग दिसून आला, ज्यात एकाच दिवसात २० लाखांहून अधिक लोक सामील झाले. हा बदल प्रतिबंधात्मक आरोग्य आणि शाश्वत सवयी निर्माण करण्याच्या वाढत्या प्रवृत्तीचे प्रतिबिंब आहे. या उपक्रमाला सातत्याने गती मिळत आहे, कारण भारत आणि जगभरातील सहभागी या आठवडाभर चालणाऱ्या जागतिक विक्रमाच्या प्रयत्नात सामील होत आहेत, ज्याची सांगता आंतरराष्ट्रीय योग दिनी होईल.

## मेडिकवर रुग्णालयामध्ये सीटीओ अँजिओप्लास्टीची यशस्वी कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर:** मेडिकवर रुग्णालयामध्ये हृदयविकार क्षेत्रातील अत्यंत जटिल मानल्या जाणाऱ्या सीटीओ अँजिओप्लास्टी शस्त्रक्रियांची यशस्वी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत दीर्घकाळापासून १०० टक्के बंद असलेल्या हृदयाच्या धमन्या तसेच बायपासनंतर पुन्हा समस्या निर्माण झालेल्या रुग्णांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने यशस्वी सीटीओ अँजिओप्लास्टी करण्यात आली. या कार्यशाळेसाठी प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. शरद रेड्डी यांनी विशेष उपस्थिती लावून मार्गदर्शन केले.

डॉ शरथ रेड्डी हे देश भरात या प्रकारच्या (सी टी ओ , व तावी मित्रा) शस्त्रक्रियेसाठी प्रसिद्ध व निष्णात आहेत त्यांच्या नेतृत्वाखाली मेडिकवर रुग्णालयाच्या कार्डिओलॉजी टीमने अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडल्या.

## हॅबिल्डने 10 वा जागतिक विक्रम साध्य केला

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय योग दिन 2026 च्या पूर्वसंध्येला, भारतातील हॅबिल्ड या सवयी निर्माण करणाऱ्या वेलनेस प्लॅटफॉर्मने आपला 10 वा जागतिक विक्रम साध्य केला आहे. फक्त एका आठवड्यात 1 कोटीहून अधिक लोकांनी योग चळवळीत सहभाग घेतला असून, ही जगातील सर्वात मोठ्या समुदाय-आधारित वेलनेस उपक्रमांपैकी एक ठरली आहे.हा मैलाचा दगड हॅबिल्ड च्या राष्ट्रव्यापी उपक्रम 'हर घर योगा. हर दिन होगा.' चा भाग म्हणून साध्य झाला आहे. या उपक्रमाचा उद्देश योगाला वर्षातून एकदाच साजरा करण्याऐवजी दररोजच्या जीवनाचा सातत्यपूर्ण भाग बनवणे आहे. यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या "योग फॉर हेल्दी एजिंग" या थीमशी सुसंगत राहून, या उपक्रमाने दीर्घकालीन शारीरिक आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि हेल्दी एजिंग घडवण्यासाठी दररोजच्या योगाभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

# देवगिरी बँकेच्या 34 व्या शाखेचे जालन्यात भव्य उद्घाटन

## अंबड चौफुली येथे आधुनिक बँकिंग सुविधांसह नवी शाखा सुरू; ग्राहकांचा विश्वास हीच बँकेची ताकद – किशोरदादा शितोळे



तभा वृत्तसेवा

**जालना :** देवगिरी नागरी सहकारी बँकेच्या ३४ व्या शाखेचे उद्घाटन जालना शहरातील अंबड चौफुली येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा माजी खासदार रावसाहेब पाटील दानवे, विधानपरिषदेचे मुख्य प्रतोद प्रसाद लाड, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक डॉ. नितीन खंडेलवाल, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत तसेच नगरसेवक भास्कर दानवे यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना देवगिरी बँकेचे अध्यक्ष किशोरदादा शितोळे यांनी सांगितले की, जालना शहरातील ही देवगिरी बँकेची दुसरी शाखा असून अंबड चौफुली परिसरातील नागरिकांना या शाखेमुळे अधिक सक्षम, सुरक्षित आणि आधुनिक बँकिंग सेवा उपलब्ध होणार आहेत. देवगिरी बँकेला शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त असून इंटरनेट बँकिंगसह विविध आधुनिक सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

"ग्राहकांचा विश्वास हीच देवगिरी बँकेची खरी ताकद आहे. ग्राहकांना सर्वोत्तम, सुरक्षित आणि विश्वासार्ह बँकिंग सेवा देण्यासाठी बँक कायम कटिबद्ध राहील," असेही शितोळे यांनी नमूद केले. कार्यक्रमास बँकेचे संचालक राजेश जैन, सजनराव मते, सुरेश जगदाळे, संचालिका मंगलाताई वाहेगावकर, प्रज्ञाताई तल्हार, अमिताताई लेकुरवाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रूपेंद्र कोयाळकर यांच्यासह बँकेचे अधिकारी, कर्मचारी, ग्राहक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी केले, तर आभार शाखाधिकारी संदीप दांडगे यांनी मानले.

# मनपा मिटमिटा शाळेला लवकरच नवे घर; आयुक्त अमोल येडगे यांची विद्यार्थ्यांशी संवाद साधत घोषणा

## जुलैच्या पहिल्या आठवड्यात नवीन सुसज्ज इमारतीत स्थलांतर; प्रवेशसंख्येत मोठी वाढ

तभा वृत्तसेवा



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका अंतर्गत असलेल्या मनपा माध्यमिक विद्यालय, मिटमिटा येथे महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी गुरुवारी सकाळी अचानक भेट देत विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी दहावीच्या वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती घेतली.

विद्यार्थ्यांनी नवीन शाळेत स्थलांतर कधी होणार, असा प्रश्न विचारला असता आयुक्त येडगे यांनी लवकरच शाळेचे नवीन इमारतीत स्थलांतर होणार असल्याचे सांगितले. सध्या असलेली शाळा रस्ता रुंदीकरणाच्या प्रकल्पात जाणार असल्याने शहरातील उद्योजक जुगलकिशोर तापडिया यांनी मनपा परिसरातील त्यांच्या मालकीच्या सुमारे तीन एकर जागेवर शाळेसाठी सुसज्ज इमारत उभारून दिली आहे.

शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मीकांत ननावरे यांनी सांगितले की, नवीन इमारतीतील काही किरकोळ कामे अंतिम टप्प्यात असून जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शाळेचे स्थलांतर पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

नवीन इमारत, प्रशस्त वर्गखोल्या आणि उपलब्ध शैक्षणिक सुविधांमुळे परिसरातील पालकांचा शाळेकडे कल वाढला आहे. मागील शैक्षणिक वर्षात शाळेत सुमारे ५०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. मात्र नवीन शाळेच्या सुविधांमुळे यंदा आतापर्यंत साडेसहाशेहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून प्रवेशासाठी पालकांची गर्दी कायम आहे.

यावेळी आयुक्त अमोल येडगे यांनी पालकांशी संवाद साधून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेतला. पालकांनी व्यक्त केलेल्या समाधानाबद्दल त्यांनी आनंद व्यक्त करत विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त झी टीव्ही कलाकारांचा योगाचा संदेश

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजी नगर :** आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त झी टीव्हीवरील विविध मालिकांतील कलाकारांनी योगामुळे त्यांच्या आयुष्यात झालेल्या सकारात्मक बदलांचे अनुभव शेअर करत सर्वांनी योगाचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याचे आवाहन केले आहे. योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून शारीरिक, मानसिक आणि भावनिक स्वास्थ्य जपणारी प्रभावी जीवनशैली असल्याचे कलाकारांनी सांगितले.

'गंगा माई की बेटियाँ' या मालिकेतील अमनदीप सिधू हिने योगामुळे मानसिक संतुलन, एकाग्रता आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होण्यास मदत होत असल्याचे सांगितले. 'जाने अनजाने हम मिले'मधील आयुषी खुराणाने व्यस्त शूटिंगच्या वेळापत्रकातही योगामुळे शरीर आणि मनाला नवचैतन्य मिळत असल्याचे नमूद केले.

'जगद्धात्री' मालिकेतील सयंतानी घोष हिने योगामुळे तणाव कमी होऊन मनाला शांतता लाभते आणि मानसिक आरोग्य सुधारते, असे सांगितले. 'वसुधा'मधील अभिषेक शर्मा याने योग हा स्वतःशी पुन्हा जोडणारा आणि मानसिक स्थैर्य देणारा प्रभावी मार्ग असल्याचे मत व्यक्त केले.

'लक्ष्मी निवास'मधील अक्षिता मुद्गल हिने दीर्घकाळ चालणाऱ्या शूटिंगच्या ताणातून मुक्त होण्यासाठी योग अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे सांगितले. तर 'तुम से तुम तक'मधील निहारिका चौक्सी हिने लहानपणापासून योगाची सवय लावल्यास

# शिर्डीतील 'साई तीर्थ' ठरतेय भक्ती, संस्कृती आणि मनोरंजनाचा अनोखा संगम

तभा वृत्तसेवा

**शिर्डी :** साईबाबांच्या दर्शनासाठी जगभरातून येणाऱ्या भाविकांसाठी आता शिर्डीची सहल केवळ मंदिर दर्शनापुरती मर्यादित राहिलेली नाही. साईबाबा मंदिरापासून अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरावर असलेले इर्मजिकाचे 'साई तीर्थ भक्ती थीम पार्क' हे शिर्डीतील प्रमुख पर्यटन आकर्षण म्हणून उदयास आले आहे. अध्यात्म, संस्कृती, तंत्रज्ञान, कथाकथन आणि मनोरंजन यांचा संगम घडवणारे हे भारतातील पहिले पूर्णपणे वातानुकूलित इनडोअर भक्ती थीम पार्क आहे.

मालपानी ग्रुपच्या संचालक श्रेया मालपानी यांनी 'साई तीर्थ'मधील पर्यटकांनी आवर्जून अनुभवावेत असे पाच प्रमुख आकर्षणांचा उल्लेख केला आहे.

यामध्ये 'तीर्थ यात्रा' हा अनुभव विशेष लोकप्रिय ठरत आहे. अत्याधुनिक दृश्य तंत्रज्ञान, मोशन इफेक्ट्स आणि कथाकथनाच्या माध्यमातून देशातील दहा प्रसिद्ध मंदिरांची आभासी तीर्थयात्रा येथे अनुभवता येते. तसेच शिर्डीतील



ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्त्व असलेल्या द्वारकामाईला भेट देत भाविकांना साईबाबांच्या जीवनाशी जवळून जोडले जाण्याची संधी मिळते.

साई तीर्थमधील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झालेली साईबाबांची भव्य मोझॅक कलाकृती. युवा कलाकार चिन्मय प्रभू यांनी शेकडो रुबिक्स क्यूब्सच्या साहाय्याने तयार केलेली ही कलाकृती पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

संध्याकाळच्या वेळी आयोजित करण्यात येणारा लेझर शो हा साई तीर्थचा आणखी एक खास अनुभव आहे. प्रकाश, ध्वनी आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने साईबाबांचे जीवन व शिकवण प्रभावीपणे सादर केली जाते. याशिवाय 'सबका मलिक एक' या सिनेमॅटिक सादरीकरणातून साईबाबांचा एकता, मानवता, करुणा आणि श्रद्धेचा संदेश जिवंत केला जातो.

श्रद्धा, संस्कृती, मनोरंजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम घडवणारे 'साई तीर्थ' आज शिर्डीच्या पर्यटन नकाशावरील एक महत्त्वाचे आकर्षण बनले आहे. कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक, तरुण आणि बालपर्यटकांसाठी हा अनुभव संस्मरणीय ठरत असून, अनेक पर्यटकांना 'साई तीर्थ'ला भेट दिल्याशिवाय शिर्डीचा प्रवास अपूर्ण वाटत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## सिल्लोडमध्ये सागवान लाकडावर वनविभागाची धडक कारवाई; 2 लाखांचा मुद्देमाल जप्त



सिल्लोड, (प्रतिनिधी) – गुप्त माहितीच्या आधारे वनविभागाने सिल्लोड शहरालगतच्या आव्हाना रोड परिसरात धडक कारवाई करत अवैधरित्या साठवून ठेवलेले सागवान प्रजातीचे लाकूड जप्त केले. या कारवाईत सुमारे आठ टन सागवान लाकूड व अंदाजे 2 लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित व्यक्तीविरुद्ध वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वनविभागाच्या पथकाने सोमवारी सकाळी सुमारे 11 वाजण्याच्या सुमारास आव्हाना रोड परिसरात छापा टाकला. तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणात सागवान लाकडाचा साठा आढळून आला. प्राथमिक चौकशीत हा साठा सत्तार खान इस्माईल खान यांचा असल्याचे समोर आले. त्यानंतर वनविभागाने तातडीने जप्तीची कारवाई करून संबंधितांविरुद्ध वनगुन्हा दाखल केला.

कारवाईदरम्यान अंदाजे आठ टन सागवान लाकूड जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या सागवान लाकडाची बाजारभावानुसार अंदाजे किंमत 2 लाख रुपये असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले. जप्त केलेला माल आयशर वाहनाच्या सहाय्याने शासकीय डेपोमध्ये सुरक्षितरित्या जमा करण्यात आला. याप्रकरणी जप्ती पंचनामा व इतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई मुख्य वनसंरक्षक प्रमोद चंद लाकरा उपवनसंरक्षक सुवर्णा माने, सहाय्यक वनसंरक्षक स्वप्नील भामरे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी यशपाल दिलपाक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत वनपाल रेखा बरबडे, वनरक्षक साईनाथ पवार, गणेश परदेशी, असीम शेख, विशाल जाधव, अनिल इंगळे तसेच वाहन चालक विलास नरवडे यांनी सहभाग घेतला.

कारवाईदरम्यान सिल्लोड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शामसुंदर कोठाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल आनंद पगारे व भूषण चौधरी यांनीही सहकार्य केले. वनविभागाच्या या कारवाईमुळे अवैध वृक्षतोड व लाकूड साठवणूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### अवघ्या 13 व्या वर्षी वरद थोरातची प्री-नॅशनलमध्ये झेप

## दोन महिन्यांच्या प्रशिक्षणात राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत उल्लेखनीय यश

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र रायफल असोसिएशनतर्फे मुंबई येथील एमआरए रेंज, वरळी येथे आयोजित 29 व्या कॅप्टन एस. जे. इझेकियल मेमोरियल महाराष्ट्र राज्य नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा (नवोदित) 2026 मध्ये छत्रपती संभाजीनगरच्या युवा नेमबाज वरद थोरात याने उत्कृष्ट कामगिरी करत प्री-नॅशनल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

अवघ्या 13 वर्षांच्या वरदने एअर पिस्तूल सब-युथ पुरुष गटात 400 पैकी 342 गुणांची नोंद करत ही उल्लेखनीय कामगिरी केली. विशेष म्हणजे, केवळ दोन महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर त्याने हे यश संपादन केले असून त्याच्या या कामगिरीचे क्रीडा क्षेत्रातून कौतुक होत आहे.

वरद हा लॉक एन लोड शूटिंग अरेना, छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थी आहे. त्याला आंतरराष्ट्रीय पिस्तूल नेमबाज, भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI) प्रशिक्षक, राष्ट्रीय ज्युरी तसेच विश्वचषक आणि आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतील पदक विजेते सुमेध



कुमार यांचे मार्गदर्शन लाभले. याशिवाय प्रशिक्षक चिन्मय देशपांडे यांनीही त्याला तांत्रिक प्रशिक्षण दिले.

कठोर परिश्रम, शिस्तबद्ध सराव आणि प्रशिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाच्या बळावर वरदने अल्पावधीतच हे यश मिळवले आहे. त्यामुळे आगामी प्री-नॅशनल स्पर्धेतही तो उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास क्रीडा क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला आहे.

वरद थोरातच्या या यशाबद्दल माजी स्थायी समिती सभापती दिलीप थोरात, नगरसेविका सौ. कमला दिलीप थोरात, उमेश देशपांडे तसेच क्रीडा व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.


**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

**जाहिर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १०३/२०२६.

अर्जदार :- १. मैदाबी तुराब तडवी, वय्. ७० वर्षे, धंदा, घरकाम, २. बशीर तुराब तडवी, वय. ३८ वर्षे, धंदा. मजुरी, ३. इकबाल तुराब तडवी, वय. ३० वर्षे, धंदा. मजुरी, ४. अयुब तुराब तडवी, वय. २७ वर्षे, धंदा. मजुरी, सर्व रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,

-विरुध्द-

गैरअर्जदार :- कोणीही नाही.

प्रकरण :-वारस प्रमाण-पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत तुराफ समशेर तडवी हे दि. २६/०२/२०२६ रोजी मौजे, टिटवी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे तुराफ समशेर तडवी यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख: २०/०७/२०२६.

आज दि. ११/०६/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क, स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 106/2026.

अर्जदारः- श्री. पोपट उर्फ पोपटलाल शांतीलाल चव्हाण, वयः 40 वर्षे, धंदाः- शेती रा. वरखेडी "बु" ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरूध्द //

गैरअर्जदारः-निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे शांतीलाल पेमा चव्हाण हे दिनांकः 17/11/2015 ला मौजे वरखेडी "बु" ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांकः 27/07/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- 16/06/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क, स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 109/2026.

अर्जदारः- 1) अनुसयाबाई बाबु चव्हाण, वय 65 वर्षे, धंदा शेती 2) अर्जुन बाबु चव्हाण, वयः 47 वर्षे, धंदाः शेती. 3) विजय बाबु चव्हाण, वयः 44 वर्षे, धंदाः-शेती. वरील सर्व अर्जदार रा. वरखेडी "बु" ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

// विरूध्द //

गैरअर्जदारः-निरंक.

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे बाबु पेमा चव्हाण हे दिनांक: 26/02/2019 ला मौजे वरखेडी "बु" ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांक: 27/07/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक: 16/06/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क, स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 105/2026.

अर्जदारः- 1) राजेंद्रसींग रूपचंद चुंगडे, वयः 54 वर्षे, धंदा शेती. 2) सुभाष रूपचंद चुंगडे, वयः 52 वर्षे, धंदाः शेती. वरील दोन्ही अर्जदार रा. पळासखेडा ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). 3) कौशल्याबाई राजेंद्र राजपुत, वयः 41 वर्षे, धंदाः शेती, रा. जंगीपुरा ता. जामनेर जि. जळगांव.

// विरूध्द //

गैरअर्जदारः-निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे भिकाबाई रूपचंद चुंगडे हे दिनांक 06/12/2024 ला मौजे पळासखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांक: 27/07/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- 16/06/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क, स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 107/2026.

अर्जदारः- 1) तायराबी जावेद पठाण, वयः 70 वर्षे, धंदाः मजुरी. 2) नसरीनबी जावेद खा पठाणं वयः 44 वर्षे, धंदाः घरकाम 3) अयुब जावेद पठाण, वयः 40 वर्षे, धंदाः नोकरी. वरील सर्व अर्जदार रा. सोयगांव ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) 4) शबानाबी शेख अमान, वयः 38 वर्षे, धंदाः घरकाम, रा. बील्डींग नं. 37. रूम नं. 06. गेंदालाल मील, सुरेश दादा जैन नगर, जळगांव (महाराष्ट्र).

// विरूध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे जावेद महमद खा पठाण हे दिनांक 11/01/2025 ला मौजे सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांक: 27/07/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- 16/06/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क, स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालंय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 108/2026.

अर्जदारः- 1) केदारबाई भास्कर ठमके, वयः 65 वर्षे, धंदा शेती. 2) योगेश भास्कर ठमके, वयः 35 वर्षे, धंदाः-शेती. 3) राजेंद्र भास्कर ठमके, वयः 30 वर्षे, धंदाः- शेती. वरील अर्जदार रा. शिंदोळ ता. सोयगाव जिं. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). 4) मनीषा पिता भास्कर ठमके, वयः 28 वर्षे, धंदाः घरकाम, रा. वनोली ता. सटाना जि. नाशिक.

// विरूध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे भास्कर नथ्थु ठमके हे दिनांक: 25/03/2023 ला मौजे शिंदोळ ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांक: 27/07/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक: 16/06/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क, स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 111/2026.

अर्जदारः- 1) वर्जन हरचंद राठोड, वयः 58 वर्षे, धंदाः शेती. 2) अर्जुन हरचंद राठोड, वयः 52 वर्षे, धंदाः शेती. वरील दोन्ही अर्जदार रा. जंगला तांडा ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). 3) कौशल्याबाई पंडीत चव्हाण, वयः 56 वर्षे, धंदाः शेती, रा. पिंपळगांव (कमानी) ता. जामनेर जि. जळगांव. 4) सुरजबाई राजमल पवार, वयः 54 वर्षे, धंदाः शेती, रा. लोंढरी "बु" ता. जामनेर जि. जळगांव.

// विरूध्द //

गैरअर्जदारः-निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे नालोबाई हरचंद राठोड हे दिनांकः 13/03/2025 ला मौजे जंगला तांडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक: 27/07/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक: 16/06/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क, स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- 124/2026.

अर्जदारः 1) मीराबाई चंड्नु राठोड, वयः 72 वर्षे, धंदाः शेती. 2) आदर्श धारासींग राठोड, वयः 10 वर्षे, धंदाः शेती. वरील दोन्ही अर्जदार रा. बनोटी तांडा ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरूध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस, महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नागे धारासींग चत्रु राठोड हे दिनांकः 26/05/2025 ला मौजे बनोटी तांडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा

अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांक: 20/07/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा, अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः : 19/06/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क, स्तर, सोयगांव

**जाहिर प्रकटन**

**मा. जिल्हा व सत्र न्यायधिश तिसरे श्री. एन. पी. मेहता साहेब, औरंगाबाद यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.१४१/२०२६.

पुढची तारीख २०/०६/२०२६.

१. श्वेता विजयकुमार संचेती, वय ५३ वर्षे धंदा शेती, रा. जैन मंदीराजवळ, गांधी चौक पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगांव, २. उत्कर्ष विजयकुमार संचेती, वय १५ वर्षे धंदा शिक्षण (ईयत्ता नववी). अज्ञानपालनकर्ता म्हणुन अर्जदार क्रं. १. ३. रुषभ विजयकुमार संचेती, वय २७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे,

विरुद्ध

महाराष्ट्र सरकार तर्फे जिल्हाधीकारी, औरंगाबाद

प्रकरण :-अज्ञान मुलाच्या नावावर असलेली मिळकत विक्री करण्याची परवानगी मिळणे कलम ८ हिंदु मायनॉरीटी गार्डीयन ॲक्ट १९५६ अन्वये...

ज्याअर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात ॲड. स्वप्निल र. सुरळकर, यांच्या मार्फत अज्ञान मुलाच्या नावे असलेले मिळकत कलम ८ हिंदु मायनॉरीटी ॲक्ट १९५६ विक्री करण्याची परवानगी मिळावी याकरीता प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार क्रं. १ ही मयत विजयकुमार सुमनलाल संचेती यांची कायदेशीर पत्नी असुन अर्जदार नंबर २ व ३ हे मुले आहेत. मयत विजयकुमार सुमनलाल संचेती यांचा दिनांक २६/०६/२०१३ रोजी पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगांव येथे मृत्यु झालेला आहे. मिळकत गट नंबर १०५ पैकी १ हे. ६६ आर ४ आर पोटखराब मौजे पोहरी बु., ता. सोयगांव. जि. छत्रपती संभाजीनगर ही मिळकत मयत विजयकुमार सुमनलाल संचेती यांच्या नावे होती. ते मयत झाल्यानंतर सदर मिळकत ही अर्जदार क्रं. १ ते ३ यांच्या नावे वारसाआधारे आलेली आहे. अर्जदार क्रं. २ हा अज्ञान असुन अर्जदार क्रं. १ हो त्याची आई/पालनकर्ता आहे. अर्जदार क्रं. २ च्या पुढील शिक्षण, वैदयकीय व ईतर खर्चासाठी वर नमुद मिळकत ही अर्जदार यांना विक्री करावयाची आहे.

तरी ज्या कोणाला सदर प्रकरणा संबंधी उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा प्रकरणात योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

आजरोजी दिनांक /०४/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक अधिक्षक

(जिल्हा न्यायालय औरंगाबाद.)